- वितरण -
नागपूर-अकोला-वाशिम-खामगाव-बुलढाणा-अमरावती-वर्धा-यवतमाळ-चंद्रपूर-गडचिरोली-भंडारा-गोंदिया

सोने-चांदी
- २४ कॅरेट : १,५८,७०० /-
- २३ कॅरेट : १,५६,३५० /-
- चांदी : २,७८,३००/-

दैनिक
# सिंहवाणी वृत्त
प्रखर लेखणीचा साक्षीदार

संपादक (विकास) : श्याम पेठकर | संचालक-संपादक : अजय बिवडे

विदर्भातील सर्व जिल्ह्यामध्ये प्रतिनिधी नेमणे आहे...
विदर्भातील सर्व जिल्ह्यांमध्ये शहर, ग्रामिण भागात प्रतिनिधी नेमणे आहे. अनुभवी व इच्छुक असलेल्यांनी संपर्क साधावा...
- दैनिक सिंहवाणी वृत्त -
९६५७२३२०२६, ८६९८७८८६६६

Reg. No : MHBIL/25/A4140 | Mail Id : sinhvanivrutta@gmail.com | दिनांक : बुधवार, १५ जुलै २०२६ | Epaper : epaper.sinhvani.com | पृष्ठे : ४ | वर्ष : १ | अंक : २१६ | किंमत : २ रूपये

सर्व प्रकारची प्रिंटींग अगदी कमी दरात...
नागपूरातून अत्याधुनिक छपाई मशीनव्दारे कमी दरात सर्व प्रकारची प्रिंटींग करण्याची सुवर्णसंधी...
- आजच संपर्क करा -
८६९८७८८६६६
९६५७२३२०२६

# शिंदे दिल्लीत, जयंत पाटील वर्षा बंगल्यावर
## मुंबई, राजधानी दिल्लीत राजकीय घडामोडींना वेग

**वृत्तसंस्था, मुंबई/नवी दिल्ली**
संसदेच्या पावसाळी अधिवेशनाच्या अगोदर राजधानी दिल्ली आणि मुंबईत राजकीय घडामोडींना वेग आला आहे. मंगळवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे ठाकरे गटातील बंडखोर खासदारांना सोबत घेऊन दिल्लीत दाखल झाले असून, रात्री उशिरा ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे समजते.
दरम्यान, मुंबईत राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे नेते जयंत पाटील आणि अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, प्रफुल्ल पटेल यांनी रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा बंगल्यावर दाखल झाले. त्यामुळे या नेत्यांमध्ये नेमकी काय चर्चा झाली, याबाबत उलटसुलट चर्चा रंगली आहे.
संसदेच्या पावसाळी अधिवेशनापूर्वी राजधानी दिल्लीत केंद्रीय मंत्रिमंडळात फेरबदल होणार असल्याचे सूत्रांचे म्हणणे आहे. त्यातच आगामी अधिवेशनात महिला आरक्षणासोबत मतदारसंघ पुनर्रचना विधेयक नव्याने



मांडले जाणार आहे. त्यामुळे जास्तीत जास्त खासदारांचे पाठबळ मिळवून बहुमताने हे विधेयक मंजूर करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्नशील आहे. त्यामुळे जास्तीत जास्त खासदार फोडून एनडीएला बळ मिळवून देण्यासाठी नेते कामाला लागले आहेत. यातूनच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाकरे गटाला भगदाड पाडले. त्यानंतर राष्ट्रवादी शरद पवार यांच्या पक्षाला धक्का देण्याची तयारी सुरू झाल्याचे सूत्रांचे म्हणणे होते.
दरम्यान, मंगळवारी रात्री उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे खासदारांना घेऊन दिल्लीत दाखल झाले आणि ते केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासोबत गुप्तगू करणार आहेत. त्याचवेळी मुंबईत राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते जयंत पाटील रात्री उशिरा मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर दाखल झाले. विशेष म्हणजे तत्पूर्वी जयंत पाटील आणि अजित पवार गटाच्या राष्ट्रवादीचे नेते सुनिल तटकरे आणि प्रफुल्ल पटेल यांची एकत्रित बैठक झाली आणि त्यानंतर ते मुख्यमंत्र्यांच्या भेटीला गेल्याचे समजते. त्यामुळे रात्री उशिरापर्यंत वर्षा बंगल्यावर नेमकी काय चर्चा झाली, याबाबत उलटसुलट चर्चा आहे.

**सव्वातास चर्चा?**
शरद पवार पक्षाचे जयंत पाटील आणि अजित पवार पक्षाचे नेते प्रफुल्ल पटेल आणि सुनिल तटकरे यांनी वर्षा बंगल्यावर जाऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत सव्वातास चर्चा केली आहे. या भेटीत नेमकी काय चर्चा झाली, हे मात्र गुलदस्त्यात आहे.


**शरद पवार गट एनडीएसोबत?**
शरद पवार गटाचे ज्येष्ठ नेते जयंत पाटील यांनी मंगळवारी रात्री उशिरा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची वर्षा बंगल्यावर जाऊन भेट घेतली. त्यामुळे शरद पवार गट एनडीएसोबत जाणार का, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. दरम्यान, शरद पवार पक्षाचे काही आमदार आणि खासदार भाजपसोबत जायला उत्सुक असल्याची माहिती आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काय निर्णय घेते, हे पाहावे लागेल.

**थोडक्यात**

### बंगालच्या उपसागरात ९ मच्छिमारांचे मृतदेह सापडले

**कोलकाता :** पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगनाजवळ बंगालच्या उपसागरात बुडालेल्या एका ट्रॉलरमधून आठ दिवसांनंतर ९ मच्छिमारांचे मृतदेह सापडले आहेत. सहा मच्छिमार अजूनही बेपत्ता असून त्यांचा शोध सुरू आहे. जय माँ काली नावाचा ट्रॉलर २ जुलै रोजी पूर्व मेदिनीपूर जिल्ह्यातील शंकरपूर मासेमारी बंदरातून १५ मच्छिमारांना घेऊन समुद्रात मासेमारीसाठी निघाला होता. ६ जुलै नंतर ट्रॉलरशी संपर्क तुटला होता. अधिकाऱ्याने सांगितले की, समुद्रात अनेक दिवस राहिल्यामुळे मृतदेह खूप कुजले आहेत आणि त्यांची ओळख पटवणे कठीण आहे. आता त्यांची ओळख डीएनए तपासणीनंतरच पटू शकेल. पंतप्रधान मोदींनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त करत मृतांच्या कुटुंबीयांना पीएमएनआरएफमधून प्रत्येकी दोन लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे. जिल्हा प्रशासनानुसार, पोलिस आणि भारतीय तटरक्षक दलाने आठ दिवसांच्या शोध मोहिमेनंतर शनिवारी बक्खाली किनाऱ्यापासून ३५ किलोमीटर दूर बाघेर चारजवळ बुडालेल्या ट्रॉलरचा शोध लावला. रविवारी मासेमारी करणाऱ्या इतर ट्रॉलर्सच्या मदतीने तो पाथरप्रतिमा येथील सीतारामपूर किनाऱ्यापर्यंत आणण्यात आला. त्यानंतर रात्रभर चाललेल्या बचाव मोहिमेत ट्रॉलरमधून ९ मच्छिमारांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. प्राथमिक तपासानुसार, बंगालच्या उपसागरातील खराब हवामानामुळे ट्रॉलर उलटल्याचा अंदाज आहे. तथापि, अपघाताचे खरे कारण तपास पूर्ण झाल्यानंतरच समोर येईल.

## सरसकट कर्जमाफीवर मंत्रिमंडळाचे शिक्कामोर्तब




**वृत्तसंस्था, मुंबई**
राज्य सरकारच्या महात्मा जोतीराव फुले शेतकरी सन्मान २०१९ च्या योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना सरसकट दोन लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळात केली होती. या निर्णयावर आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत शिक्कामोर्तब करण्यात आले. या निर्णयामुळे १३ लाख शेतकऱ्यांना लाभ मिळणार आहे. याशिवाय सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे.
राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात अंतिम आठवडा प्रस्तवावरील चर्चेला उत्तर देताना फडणवीस यांनी २०१९ च्या योजनेतील लाभार्थी शेतकऱ्यांना ५० हजार ऐवजी दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याचे जाहीर केले होते. या पार्श्वभूमीवर आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ च्या निकषात सुधारणा करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयाने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.
या निकष सुधारणेमुळे २०१९ च्या कर्जमाफी योजनेतील सुमारे १३ लाख शेतकऱ्यांसाठीची ५० हजार रुपयांपर्यंतची मर्यादा रद्द करून त्यांना नियमित कर्जमाफी मिळणार आहे.
तर सन २०२६-२७ मधील नियमित परतफेडीची अट रद्द केल्याने २३ लाख शेतकऱ्यांनाही प्रोत्साहनपर लाभ मिळणार आहे. राज्यातील ५६ लाख शेतकऱ्यांना ३६ हजार ५८५ कोटी रुपयांचा लाभ देणारी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना सरकारने यापूर्वीच जाहीर केली आहे.

## एसटी महामंडळाच्या जागा ९८ वर्षांसाठी भाडेपट्ट्याने देण्यास मंत्रिमंडळाची मान्यता

**वृत्तसंस्था, मुंबई**
राज्यातील महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या मालकीच्या मालमत्तांचा खासगीकरणातून विकासाची परवानगी देणाऱ्या मुद्रीकरण धोरणास मंगळवार दि. १४ जुलै रोजी राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. तसेच एसटी महामंडळाकडील अतिरिक्त जागा विकासासाठी भाडेपट्ट्याने देण्यासही मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. विविध योजनांमुळे तिजोरीवर येणाऱ्या भारामुळे सरकार बेजार असून विकासासाठी आता खासगीकरणाचा आधार घेण्याची भूमिका सरकारने घेतली आहे. नवीन धोरणामुळे जागांची लीज होणार आहे. पण मालकी सदैव एसटी महामंडळाचीच असणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.
महानगरपालिका, नगरपरिषद आणि नगरपंचायतींना आर्थिकदृष्ट्या अधिक सक्षम व स्वावलंबी करण्यासाठी त्यांच्या मालकीच्या मालमत्तांचा खाजगीकरणातून विकासाची परवानगी देणाऱ्या धोरणास आज राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मालकीच्या जागा, इमारती,




व्यावसायिक संकुले, बाजारपेठा, सार्वजनिक सुविधा, तसेच इतर स्थावर मालमत्तांचा नियोजनबद्ध आणि पारदर्शक पद्धतीने विकास करून त्यातून उत्पन्न वाढविणे, हा या धोरणाचा प्रमुख उद्देश आहे. या धोरणामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना स्वतःचे शाश्वत आर्थिक स्त्रोत उपलब्ध होतील. त्यामुळे पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, आरोग्य, शिक्षण, वाहतूक आणि इतर नागरी सुविधा अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक निधी उभारणे शक्य होणार आहे. तसेच केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानावरील अवलंबित्व कमी होऊन स्थानिक संस्थांची आर्थिक स्वायत्तता अधिक बळकट होईल, असे सरकारचे म्हणणे आहे.
मालमत्तांच्या विकासासाठी सार्वजनिक-खासगी भागीदारी तसेच अन्य योग्य विकास मॉडेलचा अवलंब करता येणार असून सर्व प्रक्रिया पारदर्शक, स्पर्धात्मक आणि नागरिकहिताला प्राधान्य देणाऱ्या पद्धतीने राबविण्यात येणार आहेत. राज्यात सध्या २९ महानगरपालिका, १५ अ वर्ग नगरपरिषदा, ७८ ब वर्ग नगरपरिषदा, १४६ क वर्ग नगरपरिषदा आणि ७४३ नगरपंचायती कार्यरत आहेत. या सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना या धोरणाचा लाभ होणार असून त्यांच्या आर्थिक क्षमतेत वाढ होऊन नागरी विकासाला अधिक गती मिळण्यास मदत होणार आहे. हे धोरण ३१ जुलै २०३१ पर्यंत किंवा नवीन धोरण येईपर्यंत लागू राहील.

**दीर्घ मूदत; मालकी मात्र एसटीचीच**
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) ताब्यातील अतिरिक्त जागांच्या विकास करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक-खासगी भागीदारी धोरणातून सवलत देण्यास मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे एसटीच्या जमीनी भाडेपट्ट्याने देता येतील व त्यावरील विकास प्रकल्पाना गती मिळेल. एसटी महामंडळाची एकही जागा विकली जाणार नाही. दीर्घ मुदतीच्या विकासाची आपण योजना तयार केली आहे. त्यानुसार जागांची लीज होणार आहे. पण मालकी सदैव एसटी महामंडळाचीच असणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले.

**राज्यात ३५०० एकर जागा**
महामंडळाच्या राज्यात सुमारे ८५० ठिकाणी ३५०० एकर जागा आहे. यातील बऱ्याचश्या जागा मध्यवर्ती ठिकाणी आहेत. त्या सार्वजनिक खाजगी सहभागा अंतर्गत विकसित करून महामंडळास नियमित उत्पन्नाचा स्त्रोत उपलब्ध करण्याचे नियोजन आहे. त्यातील काही जागांचा वापर बस स्थानक सुविधांसह अनुषंगिक वाणिज्य स्वरूपाचा तर काही जागा पूर्णतः रहिवाशी स्वरूपाच्या आहेत. अशा जागा विकसित करीत असताना बहुतांश वाणिज्य जागांवर व्यापारी संकुलासोबत रहिवाशी, अन्य उपयोगाची मान्यता मिळाल्यास पूर्णतः व्यावसायिक वापर करून महामंडळास फायदा मिळणे शक्य आहे.

**२१३ ठिकाणांचा प्रस्ताव सादर**
राज्य शासनाने १ सप्टेंबर २०२५ च्या शासन निर्णयान्वये महामंडळाच्या जागा व्यापारी तत्त्वावर विकसीत करण्यास मंजुरी दिली आहे. या निर्णयानुसार आणि आठ एप्रिल २०२६ च्या शासन निर्णयान्वये उत्पन्नवाढीसाठी जागा विविध व्यावसायिक प्रयोजनासाठी ४९ अधिक ४९ वर्षांच्या म्हणजेच ९८ वर्षासाठी भाडे तत्वावर विकसित करण्यास मान्यता दिली आहे. महामंडळाच्या जागा सार्वजनिक खाजगी भागीदारी तत्वावर विकसित करताना निवासी, अनिवासी, व्यापारी, औद्योगिक इत्यादी सर्व बाबींसाठी वापरण्यास मान्यता देण्यात आली. महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्यावतीने राज्यातील एकूण २१३ ठिकाणांच्या विकासाबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला आहे. या सर्व जागांच्या विकासासाठी मंत्रिमंडळ पायाभूत सुविधा समिती, शक्ती प्रदत्त समितीची मान्यता घेण्यातून सवलत देण्यात आली आहे. मात्र प्रकल्पास शासन स्तरावरून अंतिम मान्यता घेणे बंधनकारक असणार आहे.

**प्रत्येक गोष्टीला विरोध योग्य नाही**
या प्रस्तावाला काही संघटनांनी विरोध केला आहे. त्यावर मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, माहिती न घेता प्रत्येक गोष्टीला विरोध करणे योग्य नाही. एसटीतील सर्व घोटाळ्यांना दूर करून एसटी फायदयात आणणे ही देखील या संघटनांची जबाबदारी आहे. पण यापैकी ते कोणतेही काम करताना दिसत नाहीत असेही मुख्यमंत्री म्हणाले.

## उमरेडमधील २.३७ हेक्टर जमीन म्हाडाला हस्तांतरित

- बाजारमूल्य आकारून जमीन देण्याचा निर्णय
- महसूल मंत्र्यांच्या पुढाकाराने शासन निर्णय जारी
- तीन वर्षात प्रकल्प सुरू करण्याची अट

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर जिल्ह्यातील मौजा बेला (ता. उमरेड) येथील शासकीय जमीन नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (म्हाडा) कडे हस्तांतरित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. यासंदभार्तील शासन निर्णय महसूल व वन विभागाने जारी केला आहे.
महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी या प्रस्तावाचा सातत्याने पाठपुरावा करून संबंधित विभागांशी समन्वय साधला. मुख्यमंत्री यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रस्ताव मंजुरीपर्यंत पोहोचल्याने
नागपूर जिल्ह्यातील उमरेड तालुक्यातील मौजा बेला येथील सर्वे क्रमांक ३८५ मधील सुमारे २.३७० हेक्टर शासकीय जमीन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) कडे हस्तांतरित करण्यास मंजुरी दिली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीला चालना मिळणार आहे.
शासन निर्णयानुसार संबंधित जमीन प्रचलित बाजारमूल्य आकारून महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण(म्हाडा) कडे वर्ग करण्यात येणार असून, तिचा वापर केवळ गृहनिर्माण प्रकल्पासाठीच करता येणार आहे. शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय जमीन



विक्री, हस्तांतरण, गहाण, भाडेपट्टा अथवा इतर कोणत्याही कारणासाठी वापर करता येणार नाही.
शासनाने या मंजुरीसाठी विविध अटी घातल्या आहेत. त्यानुसार जमीन ताब्यात घेतल्यानंतर तीन वर्षांच्या आत गृहनिर्माण प्रकल्पाचे काम सुरू करणे बंधनकारक राहणार आहे. तसेच संबंधित नियोजन प्राधिकरणाचे विकास नियंत्रण नियम, गृहनिर्माण विभागाच्या

> उमरेड तालुक्यातील बेला येथील शासकीय जमीन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा)कडे हस्तांतरित करण्याचा निर्णय हा सर्वसामान्यांना परवडणारी घरे उपलब्ध करून देण्याच्या राज्य शासनाच्या धोरणाला बळ देणारा आहे. या प्रकल्पामुळे परिसरातील नागरिकांचे स्वतःच्या घराचे स्वप्न साकार होण्यास मदत होईल. विदर्भातील गृहनिर्माण विकासाला चालना देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, हा निर्णय त्या दिशेने महत्त्वाचे पाऊल आहे.
> **- चंद्रशेखर बावनकुळे**

अटी तसेच जलसंपदा विभागाने घालून दिलेल्या अटींचे पालन करावे लागणार आहे.
याशिवाय, प्रकल्पामुळे परिसरातील खासगी जमिनींना किंवा नागरिकांच्या प्रवेशमार्गाला कोणताही अडथळा निर्माण होणार नाही, याची जबाबदारी संबंधित यंत्रणेवर राहील.
शासनाने घालून दिलेल्या अटींचे उल्लंघन झाल्यास संबंधित जमीन परत घेण्याचा अधिकार शासनाकडे राहणार असल्याचेही शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.
या निर्णयामुळे उमरेड परिसरात नियोजित गृहनिर्माण प्रकल्पाला गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्यात सर्वसामान्यांसाठी परवडणाऱ्या घरांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी सातत्याने निर्णय घेणारे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला मंजुरी दिल्याबद्दल त्यांचे आभार.

## पाकिस्तान भिकेच्या उंबरठ्यावर

**वृत्तसंस्था, रावळपिंडी**
मरणाने केली सुटका, जगण्याने छळले होते! हे शब्दही बोचावेत असे वास्तव सध्या पाकिस्तानात आणि विशेषतः रावळपिंडीत आहे. एकीकडे पाकिस्तान सरकार जगभर मोठायकी करत फिरतेय, शांतता समझोत्यांमध्ये मध्यस्थी करतेय. आपल्याशिवाय ट्रम्प यांचे पान हलत नाही, म्हणत पंतप्रधान आणि लष्करप्रमुख तोऱ्यात फिरत आहेत. अफगाणिस्तानवर हवाई हल्ले करत अफगाणी लोकांना तंदूर म्हणत हिणवत आहेत आणि दुसरीकडे देशात जिवंतपणीच नाही तर मेल्यावरही माणसांच्या वाट्याला फक्त परवडच येते आहे.
पाकिस्तानी माणसांच्या वाट्याला आपले जीवलग गमावल्यावरही काय मरणयातना येत आहेत, अर्थातच जगभर त्याच्या बातम्या झाल्या. पाकिस्तानातली महागाई अगदी माणसांच्या कबरीपर्यंत जाऊन पोहोचली आहे. आपल्या जीवाभावाच्या माणसांना शेवटचा निरोप देतानाही अनेकांना याच्या-त्याच्याकडे हात पसरावे लागत आहेत, कर्ज काढावे लागत आहे. त्यात आता देशाच्या आणि विविध प्रांतांच्या नव्या अर्थसंकल्पात सरकारने नवे कर लागू केले. त्याचा फटका बाकी गोष्टींना तर बसलाच, पण अन्त्यसंस्कारांसाठी होणारा खर्चही वाढला. पूर्वी काही लोक विनामोबदला कबर खणून देत, तेही आता उरलेले नाहीत. त्यामुळे त्यासाठीही पैसे मोजावे लागतात. विटा-सिमेंटची साधी कबर, संगमरवरी कबर यासाठी अधिक पैसा खर्च करण्यावाचून पर्याय नाही. त्यात समाजाचा दबाव असल्याने सर्व रीतीभातीनुसार करावेच लागते. दफनविधीनंतर नातेवाइकांसह समाजातील लोकांना देण्यात येणाऱ्या भोजनासाठीच्या खर्चातही वाढ झालेली आहे. अजूनही अनेक लोक बँकेत खाते उघडत नाहीत. महागाई जास्त, क्रयशक्ती कमी यामुळे कर्जबाजारी होत सावकारांच्या तडाख्यात अडकणा-यांची संख्याही मोठी आहे.

**कफन-दफनसाठी लोकांकडे पैसे नाहीत**
कफन-दफन करायला अनेकांकडे पैसे नाहीत, कबरीसाठी जागा घ्यायची तर आता पैसे नाहीत, अन्त्ययात्रेसाठी आवश्यक सामान आणायला पैसे नाहीत. अशावेळी उधार-उसनवारी करून गरज भागवली जाते. माणसे एकमेकांना मदतही करतात. पण आधीच पिचलेल्या कुटुंबावर कर्जाचा डोंगर वाढत जातो.

संपादकीय लेखणीतून...

# खडकांत लुप्त सुंदर मुर्ती व रंगविशेष!

आम्ही खडकांशिवाय कुठे असू? खडकाळ प्रदेशात- रॉक हंटवर जा आणि काही आश्चर्यकारकपणे सुंदर आणि दुर्मिळ असलेल्या खडकांसह तुम्हाला किती भिन्न प्रकार सापडतील ते पहाच. जगभरातील लोकांना खडकांबद्दल अधिक जाणून घेता यावे, यासाठी १३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय रॉक डे निश्चित करण्यात आला आहे. हे रॉक आणि रोल संगीताबद्दल नाही; हे सर्व दगडांच्या विविधतेबद्दल आहे! शेवटी, खडक पर्यावरणात मोठी भूमिका निभावतात आणि मानवाकडून अनेक वर्षांपासून त्यांचा वापर केला जात आहे. खडक किंवा दगड हे एक किंवा अधिक खनिजे किंवा खनिज पदार्थांचे नैसर्गिकरित्या घडणारे घन पदार्थ आहेत. उदाहरणार्थ, सामान्य रॉक ग्रॅनाइट हे क्वाट्र्ज, फेल्डस्पार आणि बायोटाइट खनिजांचे मिश्रण आहे. पृथ्वीचा बाह्य घन थर, लिथोस्फियर, खडकापासून बनलेला आहे. संपूर्ण इतिहासात मानवजातीने खडकांचा वापर केला आहे. अश्मयुगापासून दगडांचा वापर अवजारांसाठी केला जात आहे. खडकांमध्ये आढळणारी खनिजे आणि धातू मानवी संस्कृतीसाठी आवश्यक आहेत. जगभरातील लोकांना खडकांबद्दल अधिक जाणून घेता यावे, यासाठी १३ जुलै हा दिवस आंतरराष्ट्रीय रॉक डे निश्चित करण्यात आला आहे. हे रॉक आणि रोल संगीताबद्दल नाही; हे सर्व दगडांच्या विविधतेबद्दल आहे! शेवटी, खडक पर्यावरणात मोठी भूमिका निभावतात आणि मानवाकडून अनेक वर्षांपासून त्यांचा वापर केला जात आहे. त्याविषयी थोडी थोड़ी आस्था असणे अगत्याचे आहे.

खडकांचे तीन प्रमुख गट परिभाषित केले आहेत- अग्निज खडक, गाळाचे खडक आणि रूपांतरित खडक. खडकांच्या वैज्ञानिक अभ्यासाला पेट्रोलॉजी म्हणतात, जो भूविज्ञानाचा एक आवश्यक घटक आहे. ग्रॅन्युलर स्तरावर, खडक खनिजांच्या कणांनी बनलेले असतात, जे यामधून रासायनिक संयुगापासून तयार झालेले एकसंघ घन पदार्थ असतात. जे व्यवस्थितपणे संरचित झालेले असतात. खडक तयार करणारी एकूण खनिजे रासायनिक बंधांनी एकत्र येतात. खडकामध्ये खनिजांचे प्रकार आणि विपुलता हे खडक ज्या पद्धतीने तयार झाले त्यावरून निश्चित केले जाते. अनेक खडकांमध्ये वाळू-सिलिका असते; सिलिकॉन आणि ऑक्सिजनचे एक संयुग जे पृथ्वीच्या कवचाच्या ७४.३ टक्के भाग बनवते. ही सामग्री खडकात इतर संयुगांसह क्रिस्टल्स बनवते. खडक आणि खनिजांमध्ये सिलिकाचे प्रमाण हे त्यांचे नाव आणि गुणधर्म ठरवण्यासाठी एक प्रमुख घटक आहे.

आंतरराष्ट्रीय रॉक डेचा इतिहास असा आहे, आंतरराष्ट्रीय रॉक डे हा खडकाचे महत्व उजागर करण्याचा दिवस आहे, जो मानवजातीच्या अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण आहे. संपूर्ण इतिहासात खडकांचा वापर केला गेला आहे. अश्मयुगापासून खडक शस्त्रे आणि साधने म्हणून वापरण्यासाठी महत्त्वाचे आहेत. खडकांमध्ये सापडलेले धातू आणि खनिजे मानवी सभ्यतेसाठी महत्त्वपूर्ण- मौल्यवान आहेत. आधुनिक युगात खडक इमारतीच्या पायाभरणीत तसेच बारीक तुकडे करून गिट्टीच्या स्वरूपात रस्ते, पटांगण व स्लॅब सपाटीकरणात वापरले जातात. मूर्तिकार लोक खडकातून सुबक, सुंदर, चित्ताकर्षक मूर्ती घडवितात. रासायनिक रचना, पारगम्यता, घटक कणांचा पोत आणि कण आकार यासारख्या वैशिष्ट्यांनुसार खडकांचे भौगोलिकदृष्ट्या वर्गीकरण केले जाते. हे भौतिक गुणधर्म हे खडक तयार करणाऱ्या प्रक्रियेचे अंतिम परिणाम आहेत. कालांतराने खडकांचे एका प्रकारातून दुसऱ्या प्रकारात रूपांतर होऊ शकते, ज्याचे वर्णन रॉक सायकल नावाच्या भूवैज्ञानिक मॉडेलने केले आहे. या घटना खडकाचे तीन सामान्य वर्ग तयार करतात- अग्निज, गाळाचे आणि रूपांतरित खडके. खडकांचे हे तीन वर्ग अनेक गटांमध्ये विभागलेले आहेत. तथापि, संलग्न खडकांमध्ये कठोर आणि वेगवान सीमा नाहीत. त्यांच्या घटक खनिजांच्या प्रमाणात वाढ किंवा घट करून ते प्रत्येक श्रेणीत एकमेकांमध्ये जातात, एका प्रकारच्या खडकाची विशिष्ट रचना देखील हळूहळू दुसऱ्या खडकामध्ये विलीन होत असल्याचे आढळून येते. म्हणूनच रॉक नामांकन स्थापित करताना स्वीकारलेल्या व्याख्या केवळ सतत पदवीप्राप्त मालिकेतील कमी-अधिक अनियंत्रित निवडलेल्या बिंदूंशी संबंधित असतात.

आंतरराष्ट्रीय रॉक डे असा साजरा करायचा असतो, आपण आंतरराष्ट्रीय रॉक डे साजरा करू शकतो, अशा अनेक पद्धती आहेत. यापैकी एक पर्याय म्हणजे जगभरात उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या खडकांवर तसेच या खडकांचे वेगवेगळे उपयोग यावर थोडे निरीक्षण व संशोधन करणे. आपण हे ज्ञान आपल्या मित्र आणि कुटुंबासह सामायिक करू शकतो. एकत्र खडकाळ भागात- रॉक हंटवर आपण जरूर गेले पाहिजे. आपण विविध प्रकारचे खडक गोळा करून त्यांच्याबद्दल जाणून घेऊ शकतो. आपल्या आवडत्या लोकांसोबत काहीतरी वेगळे करण्यात आपला वेळ घालवणे, खडकांचे नमुने जमविणे नेहमीच मजेदार असते. आंतरराष्ट्रीय रॉक डे साजरा करण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे खडकांचा समावेश असलेल्या कला प्रकल्पाचा आनंद घेणे.

# पैलतीराची संजीवनी वारी हा स्त्रीच्या आदिम मुक्तीचा महासोहळा

प्रा. डॉ. सुधीर अग्रवाल
वर्धा

उंबरठ्याच्या मर्यादित भूमितीला सासरची सवय मानून जगणाऱ्या मराठी स्त्रीचे जगणं म्हणजे एक निरंतर मूक संथ प्रवाह. पहाटेच्या अंधारात जात्यावरल्या ओवीतून पाझरणारे तिचे मातृत्व आणि दिवसाच्या उन्हात चुलीच्या धुरासोबत डोळ्यांत साचणारी तिची वेदना... पदराची आच आणि कुळाची अब्रू राखता राखता, स्वतःचे विस्तीर्ण आभाळ विसरून गेलेल्या या धरित्रीला जर कोणी कधी हळूच विचारले, तुज्या 'स्व'त्वाचे अथांग आकाश कुठे ग दडले आहे?' तर ती तिच्या थकलेल्या पण तृप्त डोळ्यांत साऱ्या विश्वाचे कारुण्य साठवून भरल्या आवाजात सांगेल की, माझं अवघं आकाश माज्या सावळ्या विठूच्या वारीत दडलेलं आहे.

होय, पंढरीची वारी.. हे सत्यकथन आहे. वरकरणी हा आषाढ-कार्तिकीच्या लयीवर चालणारा एक आध्यात्मिक प्रवास वाटेल, परंतु पुरोगामी समाजाच्या चौकटी ओलांडून जर अंतर्यामी पाहिले, तर ही तर शतकानुशतके घराच्या चार भिंतींच्या कारागृहात कोंडल्या गेलेल्या स्त्रीच्या आदिम मुक्तीचा, तिच्या आत्मभानाचा आणि तिच्या सात्त्विक बंडाचा एक देखणा, अभूतपूर्व लोकसोहळा आहे. सासरचा जाच जिथे कापरासारखा उडून जातो, संसाराचे जड ओझे जिथे फुलासारखे हलके होते आणि पाठीवर पडणारा विठूचा मायेचा हात जिथे 'स्वातंत्र्याचा सोन्याचा पंख' बनून येतो, तीच ही तिचं पंढरीची पावन वाट....

सावळ्या आईचे चिरंतन, अभेद्य माहेरघर म्हणजे मायेच्या माऊलीचे पंढरपूर. मराठी संस्कृतीच्या गाभाऱ्यात आणि लोकजीवनाच्या सुवर्णमयी पानात 'माहेर' या शब्दाशी स्त्रीचे नाते केवळ भौगोलिक अंतराचे नसते, तर ते तिच्या अस्तित्वाचे हक्काचे सिंचन असते. सासरच्या अवहेलनेचे आणि अखंड कष्टाचे उन्हाळे सोसून थकलेल्या जिवाला जिथे मायेची शीतल सावली मिळते, जिथे डोळ्यांत साचलेले अश्रू लपवण्याची गरज उरत नाही आणि जिथे काळजाला विनाअट स्वीकारले जाते, ते म्हणजे माहेर होय... परंतु, काळाच्या प्रवाहामध्ये एका वळणावर रक्ताचे माहेरही संकोचू लागते, आई-बापाची छत्रछाया आक्रसू लागते. अशा वेळी वारकरी संप्रदायाने स्त्रीला एक असे वैश्विक माहेरघर दिले, जे काळाच्या अंतापर्यंत कधीच परके होत नाही...ते म्हणजे माऊलीचे पंढरपूर.

तिथला विठ्ठल हा कोणत्या उंचावरील सिंहासनावर बसून केवळ सोवळे-ओवळे मागणारा, न्यायाचा निवाडा करणारा कठोर पुरुष-देव नाहीच मुळी! तो तर तिच्या अंतरीचा हुंदका ऐकणारी, तिच्यासाठी धावून येणारी 'विठू माऊली' आहे. ती साक्षात तिची आई आहे, म्हणूनच, संसाराचा रथ ओढून हताश झालेली ग्रामीण स्त्री जेव्हा चंद्रभागेच्या पवित्र वाळवंटात पाऊल ठेवते, तेव्हा ती कोणत्याही कर्मकांडाचे ओझे बाळगत नाही; तर एखाद्या कित्येक वर्षांनी माहेरी आलेल्या लेकीसारखी थेट विठ्ठलाच्या समचरण विटेवर डोके टेकवते आणि तिच्या डोळ्यांतून आनंदाचा आणि मुक्तीचा त्रिवेणी संगम वाहू लागतो.

संत जनाबाईंच्या भक्तीचे लेणे आठवले तर असे जाणवते की, त्यांचा विठ्ठल तर देव्हाऱ्याची मयार्दा ओलांडून जनीचा सखा झाला होता. तो तिच्यासोबत दळण दळायचा, वेचून गोवऱ्या थापायचा, तिच्या झोपडीत झाडू मारायचा आणि जनीच्या अस्ताव्यस्त अंबाड्यात प्रेमाने शेवंतीचे फूलही माळायचा. परमेश्वराला स्वतःच्या दैनंदिन श्रमाचा भागीदार बनवून घेण्याचे, त्याच्याशी लडिवाळपणे भांडण्याचे आणि स्वतःचे कोडकौतुक पुरवून घेण्याचे हे जे अथांग भावनिक स्वातंत्र्य आहे, ते फक्त पंढरपूर नावाच्या वैश्विक माहेरघरीच अनुभवता येते.

पुरोगामी उंबरठ्याचे धाडसी उल्लंघन करून स्त्रिया मुक्त झाल्या. ज्या कर्मठ आणि पुरुषप्रधान समाजव्यवस्थेने स्त्रीला केवळ 'गृहिणी' आणि 'माता' या दुहेरी चौकटीत डांबून ठेवले होते, तिच्या शब्दावर पहारे आणि तिच्या हालचालींवर मयार्दा घातल्या होत्या, त्या व्यवस्थेच्या छातीवर पाऊल ठेवून वारीने स्त्रीला घराबाहेर पडण्याचे एक कायदेशीर आणि अत्यंत पवित्र स्वातंत्र्य दिले. वारीच्या निमित्ताने तिने ओलांडलेला घराचा उंबरठा हा केवळ एका वास्तूची मयार्दा नव्हता, तर तो तिच्या गुलामगिरीच्या अंताचा आरंभ होता. वारीच्या वाटेवर निघालेली ही पायपेठ केवळ भूमीचे अंतर मोजणारी नसते, तर ती तिच्या संकुचित जगण्याला अथांग विश्वाची ओळख करून देणारी असते. मैलोन्मैल चालताना तिला निसर्गाचे ऋतू समजतात, मानवी स्वभावाचे विविध रंग दिसतात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, या गर्दीत तिला तिची अनेक वर्षांपूर्वी हरवलेली 'स्वत्वरूप ती' नव्याने गवसते.

या महाप्रवासाचे सर्वोच्च अमूर्त सौंदर्य म्हणजे, तिथे जात, पात, आर्थिक स्तर आणि सर्वात मुख्य म्हणजे 'स्त्री-पुरुष' हा देहाचा भेदच गळून पडतो. वारीमध्ये प्रत्येक प्राणिमात्राला 'माऊली' विश्वमाता या एकाच दिव्य शब्दाने संबोधिले जाते. एका पुरुषाने स्त्रीच्या चरणावर डोके टेकवून तिला 'माऊली' म्हणायचे आणि स्त्रीनेही पुरुषाला त्याच आदराने वंदन करायचे. लिंगभावाच्या पलीकडे जाऊन मानवी आत्म्याचा आणि विशेषतः स्त्रीत्वाचा साक्षात विठ्ठलरूपात गौरव करणारी ही जगातील एकमेव विलोभनीय परंपरा असावी. 'माऊली' नावाचा सात्त्विक मुकुट वारीतील स्त्रियांना जास्त जवळचा वाटतो. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून, कपाळावर बुक्का आणि डोक्यावर तुळशीवृंदावन घेऊन चालताना तिच्या चेहऱ्यावर जे अलौकिक तेज आणि निर्भयता असते, तेच तिचे खरे वैचारिक स्वातंत्र्य असते. सोशिकतेच्या गर्भातून उमललेला बंडखोरीचा सुवर्ण इतिहास म्हणजे आजची वारीतील मुक्त, समाधानी माऊली म्हणजेच वारीतील स्त्री. आज वारीची वाट जितकी सुकर आणि कौतुकास्पद वाटते, तितकी ती इतिहासाच्या कालखंडात मुळीच नव्हती. स्त्रियांच्या वारीचा इतिहास हा निव्वळ भक्तीचा अनुनय नाही, तर तो प्रस्थापित विषमतेविरुद्ध भक्तीच्या शस्त्राने लढला गेलेला एक प्रदीर्घ, देदीप्यमान आणि रक्तरंजित नसला तरी हृदयद्रावक संघर्ष आहे. संत मुक्ताबाई आणि संत जनाबाईंनी १३ व्या शतकात जेव्हा या वारकरी चळवळीचा पाया रचला, तेव्हा त्यांनी आपल्या प्रगल्भ विद्रोही अभंगांतून पुरुषी अहंकाराला आणि सामाजिक विषमतेला थेट आरसा दाखवला. मुक्ताबाईंनी तर ज्ञानदेवांसारख्या आचार्यांना "ताटी उघडा" म्हणून उपदेश करत वैचारिक नेतृत्वाची धुरा सांभाळली.

संत कान्होपात्रांचा इतिहास म्हणजे वासनांध राजसत्तेला आणि स्त्रियांचे भोग्य रूप ठरवणाऱ्या समाजाला दिलेली एक चपराक होती. त्यांनी आपल्या सौंदर्याचा बाजार मांडू पाहणाऱ्या जगाला नाकारून थेट विठ्ठलाच्या गाभाऱ्यात स्वतःचे अस्तित्व विलीन केले. संत बहिणाबाईंचा जीवनसंघर्ष तर प्रत्येक स्त्रीच्या डोळ्यात पाणी आणणारा आहे. पतीचा अमानुष मार, समाजाची विखारी निंदा आणि कौटुंबिक छळाचे निखारे पायाखाली तुडवत त्यांनी तुकोबांना गुरू मानले आणि पंढरीची वाट धरली. त्यांच्या अभंगांतून प्रकट होणारी भक्ती ही लाचार नाही, तर ती तत्कालीन रूढी-परंपरांच्या भिंतींना सुरुंग लावणारी वैचारिक क्रांती आहे. हाच दैवी वारसा आपल्या रक्तामध्ये वाहून घेत आज लाखो स्त्रिया वारीत चालत आहेत. आज त्या केवळ स्वयंपाकघरातील चुलीची धुरा सांभाळत नाहीत, तर हातात चोपदाराचा दंडक घेत, टाळाचा निनाद करत संपूर्ण दिंडीचे नेतृत्व अत्यंत आत्मविश्वासाने आणि ताठ मानेने करत आहेत.

वारीच्या वाळवंटातील स्त्री-पुरुषांचा मुक्त क्रीडा सोहळ्याचा जेंव्हा विठ्ठल साक्षीदार होतो तेंव्हा आनंदाचा गोपाळकाला होतो. वारीच्या वाटेवर केवळ पावले चालत तर तिथे मने नाचतात. या वाटेचे सर्वात विलोभनीय, तरल आणि निसर्गदत्त रूप कुठे पाहायला मिळत असेल, तर ते विसाव्याच्या विस्तीर्ण पटांगणात किंवा रिंगणाच्या मखमली धुळीत! तिथे जेव्हा टाळ-मृदंगाचा वेगळाच ठेका धरला जातो, तेव्हा एक अलौकिक ऊर्जा संपूर्ण वातावरणाला वेढून टाकते. त्या क्षणी तिथे केवळ स्त्रियांचे खेळ रंगत नाहीत, तर पुरुष आणि स्त्रिया देहभानाचे सगळे पहारे बाजूला सारून, एखाद्या लहान बालकासारखे, अथांग मोकळेपणाने एकत्र खेळू लागतात. हा खेळ म्हणजे मराठी संस्कृतीच्या अंगणात फुललेला समतेचा आणि निखळ आनंदाचा एक अद्भुत पारिजात आहे.

फुगडीचा फेर आणि मुक्तात्म्यांची गिरकी म्हणजे पांडुरंगाला प्रदक्षिणाच जणू... ज्या जगात स्त्री आणि पुरुषाच्या एकत्र येण्यावर, त्यांच्या संवादावर आणि शारीरिक अंतरावर समाजाने हजारो अदृश्य नियम आणि चौकटी लादल्या आहेत; त्या जगाच्या नियमांना वारीची वाट एका क्षणात पुसून टाकते. वारीच्या खेळात जेव्हा एखादा वारकरी आजोबा आणि एखादी माऊली एकमेकांचे हात हातात गुंफतात आणि 'फुगडी'चा फेर धरतात, तेव्हा तिथे देहाचे सगळे तट कोसळून पडतात. हवेत उडणारा अबीर, कपाळावरचा बुक्का आणि पायाखालची उडणारी धूळ या सगळ्यांच्या साक्षीने ती गिरकी सुरू होते. त्या क्षणी तो पुरुष उरत नाही आणि ती स्त्री उरत नाही; उरतात ते विठ्ठलाच्या अंगणात नाचणारे, मुक्तीचा आनंद घेणारे दोन लख्ख आत्मे..

खेळातील 'हमामा' आणि 'कोंबडा' म्हणजे बसख्यांचा लुटुपुटुचा रणसंग्राम वारीत अवतरतो. वारीच्या वाटेवर खेळल्या जाणाऱ्या 'हमामा-हुतुतू' किंवा 'कोंबडा' सारख्या पारंपरिक खेळात स्त्री-पुरुषांमधील भिंती पूर्णपणे विरघळून जातात. तिथे अबालवृद्ध एकमेकांना हक्काने आव्हान देतात. एकमेकांना हुलकावणी देणे, पाठीवर लुटुपुटुची टपली मारणे, निखळपणे हसणे आणि आनंदात 'हुर्यो' उडवणे... हा संवाद इतका पवित्र आणि आदिम असतो की तिथे वासनेला किंवा संशयाला तिळमात्र जागा उरत नाही. हा खेळ पाहताना द्वापारयुगाची आठवण यावी. जणू काही श्रीकृष्ण आपल्या गोप-गोपींसह, सवंगड्यांसह यमुनेच्या वाळवंटात सर्व बंधने विसरून खेळत आहेत आणि आपल्या शिदोऱ्या एकत्र करून 'गोपाळकाला' साजरा करत आहेत. तोच द्वापारयुगाचा सोहळा दरवर्षी आषाढ-कार्तिकीला महाराष्ट्राच्या मातीत जिवंत होतो. स्त्रीपुरुषांचे हे खेळ म्हणजे पवित्र सुरक्षिततेचे आणि आदराचे कोंदण होय. या मुक्त खेळांचे सर्वात मोठे सौंदर्य त्याच्या निखळतेत आहे. वारीत पुरुष जेव्हा स्त्रीशी खेळतो, तेव्हा त्याच्या नजरेत तिच्याविषयी कमालीचा आदर असतो आणि स्त्री जेव्हा पुरुषाच्या साथीने नाचते, तेव्हा तिच्या मनात हिमालयाएवढी सुरक्षिततेची खात्री असते. वारीतल्या या खेळांना 'माऊली' या एकाच शब्दाचे दिव्य कोंदण लाभलेले असते. भाऊ-बहिणीच्या, सख्या-सोबत्यांच्या या निकोप नात्यामुळेच स्त्रीला तिथे जे स्वातंत्र्य मिळते, ते तिला जगात इतर कुठेही अनुभवता येत नाही.

'खेळियांचा मेळा जमला
चंद्रभागे तीरी।
नाचती गोपाळ
मुक्तात्म्यांच्या गजरानी॥'

खेळ आणि भक्ती यांच्यात लीन झालेल्या, दडपलेल्या आत्म्याचा भावनिक पाऊस म्हणजे वारीतील भक्तीमेळा... दैनंदिन जीवनात पदर सावरून, डोक्यावरचा पदर निसटू नये याची काळजी घेत, मान खाली घालून, अत्यंत मोजून-मापून बोलणारी पारंपरिक स्त्री जेव्हा वारीच्या रिंगणात प्रवेश करते, तेव्हा तिचे संपूर्ण रूपच आमूलाग्र बदलून जाते. दुपारच्या विसाव्याला किंवा मावळत्या सूर्याच्या साक्षीने जेव्हा वारीच्या मैदानावर झिम्मा, फुगडी, कोंबडा, सुपली, काचपाणी आणि पिंगा रंगतो, तेव्हा ती स्वतःला या नश्वर जगाच्या सर्व बंधनांतून मुक्त करून घेते.

खेळताना मारल्या जाणाऱ्या उड्या, वेगात फेर धरताना तिचे गोल फिरणारे अस्तित्व, आणि तिच्या कंठातून फुटणाऱ्या आनंदाच्या उत्स्फूर्त किंकाळ्या... हा केवळ मनोरंजनाचा खेळ नसतो. हा तर आधुनिक मानसशास्त्राच्या परिभाषेतील एक अत्यंत मोठा भावनिक आणि मानसिक निचरा होत असतो. वर्षानुवर्षे तिच्या मनाच्या अंधाऱ्या कोपऱ्यात दडपून ठेवलेला संताप, सासरचा जाच, सोसलेली दुःखे, आणि रोजच्या जगण्याचा थकवा या खेळाच्या एका एका फेरासोबत गळून पडतो. पायात वहाण नसताना, अनवाणी पावलांनी, काट्याकुट्यांनी आणि खड्यांनी भरलेल्या वाटेवर जेव्हा एखादी ऐंशी वर्षांची आजी विठ्ठलाच्या नामावर नाचू लागते, तेव्हा ती देहभान विसरलेली असते. ती प्रत्यक्षात तिच्यावर लादलेल्या जुनाट, सनातनी सामाजिक नियमांना आपल्या पायाखाली चिरडत नाचत असते. वारीतील ही अंतर्बाह्य भक्ती तिला मनातून वज्रासारखी कणखर बनवते आणि हे खेळ तिच्या चैतन्याला मुक्तीचे मुक्त पंख देतात.

'माहेरचे सुख सांगावे ते किती।
जेथे लक्ष्मीपती विठ्ठलराव॥
बहिणी म्हणे जावे
पंढरीस लवकरी।
सुखाची ती थोरी माहेराची॥

संत शिरोमणी बहिणाबाईंनी शब्दांकित केलेले हे माहेरचे सुख आज वारीत चालणाऱ्या प्रत्येक माऊलीच्या डोळ्यांतील अश्रूंमध्ये आणि ओठांवरील हसण्यामध्ये जिवंत दिसते. वारी स्त्रीला 'स्वातंत्र्याचे मोकळे आभाळ' देते आणि पंढरपूर हे तिच्या अनाथ जिवाला 'मायेचे अभेद्य छत' देते.

संसाराचा हा अखंड गाडा ओढता ओढता जेव्हा तिचे पाय थकतात, तिचे मन विदीर्ण होते, तेव्हा वारीची ही वळणदार वाट तिच्या जिवाला नवसंजीवनीचे अमृत पाजते. टाळाच्या एका संथ लयीवर, मृदंगाच्या एका गंभीर थापेवर आणि "ज्ञानबा-तुकाराम" च्या एका सामूहिक निनादात जेव्हा लाखो स्त्रियांचे पाय एकाच तालावर पडतात... तेव्हा ती केवळ पंढरपूरची वारी उरत नाही; तर तो असतो मराठी स्त्रीने स्वतःच्या अस्तित्वाचा, स्वतःच्या आनंदाचा आणि स्वतःच्या आदिम स्वातंत्र्याचा साजरा केलेला एक अलौकिक, जागतिक महासोहळा. जणू स्वातंत्र्यमुक्तीचा मोकळा श्वासचं.

जेव्हा डोक्यावर तुळशीवृंदावन घेतलेली माऊली आणि हातात टाळ घेतलेला वारकरी एकमेकांच्या साथीने, पायात पैंजण नसतानाही काट्याकुट्यांच्या वाटेवर आनंदाने थिरकतात, तेव्हा ते केवळ खेळत नसतात. ते समाजाने निर्माण केलेल्या विषमतेच्या आणि भेदभावाच्या भिंतींना आनंदाचे सुरुंग लावत असतात. पुरुष आणि स्त्रियांचा हा मुक्त, निखळ आणि पवित्र क्रीडासोहळा वारीला केवळ एक आध्यात्मिक यात्रा ठेवत नाही; तर तिला मानवी सहजीवनाचा, परमोच्च स्वातंत्र्याचा आणि स्त्री-पुरुष समतेचा जगातील सर्वात सुंदर आणि जिवंत सोहळा बनवतो.

- ९५६१५९४३०६

# भारतीय महिलांचा लॉर्ड्सवर रॉयल विजय, विक्रमांचा पाऊस!

डॉ.दत्ता विघावे
क्रिकेट समिक्षक

भारतीय महिला संघाने लॉर्ड्सवर इंग्लंडला २७० धावांनी पराभूत करून इतिहास रचला. हा विजय केवळ भारतासाठीच अविस्मरणीय नव्हता, तर यामुळे अनेक मोठे विक्रमही प्रस्थापित झाले. वेगवान गोलंदाज क्रांती गौड, यष्टीरक्षक-फलंदाज यास्तिका भाटिया आणि स्टार सलामीवीर स्मृती मंधाना यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीने महिला क्रिकेटला नव्या उंचीवर नेले. चला, लॉर्ड्स कसोटीत प्रस्थापित झालेल्या त्या प्रमुख विक्रमांवर एक नजर टाकूया, ज्यामुळे भारताचा हा ऐतिहासिक विजय आणखी खास बनला...

**लॉर्ड्स कसोटी भारताच्या सर्वात मोठ्या विजयांपैकी एक ठरली**

भारताने इंग्लंडला २७० धावांनी पराभूत केले, जो महिलांच्या कसोटी क्रिकेटमधील धावांच्या बाबतीत भारताचा दुसरा सर्वात मोठा आणि एकूण चौथा सर्वात मोठा विजय आहे. भारताचा सर्वात मोठा विजय २०२३ मध्ये नवी मुंबईत इंग्लंडविरुद्ध ३४७ धावांनी झाला होता.

**महिलांच्या कसोटी सामन्यांतील सर्वात मोठे विजय (धावांच्या फरकाने)**

३४७ धावा - भारत महिला इंग्लंड नवी मुंबई, २०२३. ३०९ धावा -श्रीलंका महिला पाकिस्तान कोलंबो (सीसीसी), १९९८. २८६ धावा - इंग्लंड महिला दक्षिण आफ्रिका ब्लोमफॉन्टेन, २०२४. २७० धावा भारत महिला इंग्लंड लॉर्ड्स, २०२६. १८८ धावा न्यूझीलंड महिला दक्षिण आफ्रिका डर्बन, १९७२.

लॉर्ड्सवरील भारताचा हा चौथा कसोटी विजय आहे. यापूर्वी, भारतीय पुरुष संघाने १९८६ मध्ये कपिल देव, २०१४ मध्ये एम.एस. धोनी आणि २०२१ मध्ये विराट कोहली यांच्या नेतृत्वाखाली येथे विजय मिळवला होता. भारताने दुसरी सर्वोच्च सांघिक धावसंख्या नोंदवली.

भारताने या कसोटीच्या दोन्ही डावांमध्ये मिळून एकूण ६२६ धावा केल्या (पहिल्या डावात २८५ आणि दुसऱ्या डावात ३४१/७ धावांवर डाव घोषित). महिला कसोटी क्रिकेटमधील ही भारताची दुसरी सर्वोच्च धावसंख्या आहे. यापूर्वी, २०२४ मध्ये चेन्नई कसोटीत दक्षिण आफ्रिकेविरुद्ध भारतीय संघाने दोन्ही डावांमध्ये मिळून ६४० धावा केल्या होत्या. विशेष म्हणजे, भारताने दुसऱ्या डावात ३४१ धावा केल्या, आणि महिला कसोटी क्रिकेटच्या इतिहासात दुसऱ्यांदाच भारतीय संघाने दुसऱ्या डावात ३०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत. भारताच्या सर्वोच्च कसोटी धावा एकूण धावा विरोधी संघ ठिकाण, वर्ष ६४० दक्षिण आफ्रिका महिला चेन्नई, २०२४ ६२६ इंग्लंड महिला लॉर्ड्स, २०२६ ६१४ इंग्लंड महिला मुंबई (डी. वाय. पाटील), २०२३ ६०२ इंग्लंड महिला ब्लॅकपूल, १९८६ ५७५ ऑस्ट्रेलिया महिला मुंबई (ब्रेबॉर्न), १९८४ ५७५ इंग्लंड महिला ब्रिस्टल, २०२१ भारताने दुसऱ्या डावात ३४१/७ धावा केल्या, आणि महिलांच्या कसोटी सामन्यात दुसऱ्यांदा भारतीय संघाने दुसऱ्या डावात ३०० पेक्षा जास्त धावा केल्या आहेत.

**लॉर्ड्सच्या सन्मान फलकावर क्रांती गौर यांचे नाव कोरले आहे**

वेगवान गोलंदाज क्रांती गौरने पहिल्या डावात ३७ धावांत पाच बळी घेतले. महिलांच्या कसोटी सामन्यात पाच बळी घेणारी ती केवळ पाचवी भारतीय वेगवान गोलंदाज ठरली. संपूर्ण सामन्यात तिने ९१ धावांत सात बळी घेतले, जी कोणत्याही भारतीय वेगवान गोलंदाजाची तिसरी सर्वोत्तम कामगिरी आहे.

**यास्तिका भाटियाने इतिहास रचला**

यास्तिका भाटियाने दुसऱ्या डावात शानदार ११३ धावा केल्या. महिलांच्या कसोटी सामन्याच्या तिसऱ्या किंवा चौथ्या डावात शतक झळकावणारी ती पहिली भारतीय फलंदाज ठरली. महिलांच्या कसोटी सामन्यात यष्टीरक्षक म्हणून शतक झळकावणारी ती दुसरी भारतीय खेळाडूही ठरली. तिच्या आधी, अंजू जैनने १९९५ मध्ये इंग्लंडविरुद्ध शतक झळकावले होते. लॉर्ड्सवर कसोटी शतक झळकावणारी यास्तिका पहिली भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली. पुरुष आणि महिला क्रिकेट या दोन्हीमध्ये मिळून लॉर्ड्सवर कसोटी शतक झळकावणारी ती केवळ दुसरी डावखुरी भारतीय फलंदाज आहे. तिच्या आधी, सौरव गांगुलीने १९९६ मध्ये आपल्या कसोटी पदार्पणात १३१ धावा केल्या होत्या.

**स्मृती मंधानाने आपला ३०० वा आंतरराष्ट्रीय सामना खेळला**

हा सामना स्मृती मंधानाच्या कारकिर्दीतील ३०० वा आंतरराष्ट्रीय सामना होता. हा पराक्रम करणारी ती तिसरी भारतीय महिला क्रिकेटपटू ठरली आहे. तिच्या आधी फक्त मिताली राज आणि हरमनप्रीत कौर यांनी ३०० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय सामने खेळले आहेत. विशेष म्हणजे, स्मृती वयाच्या ३० वर्षांपूर्वी ३०० आंतरराष्ट्रीय सामने खेळणारी जगातील सर्वात तरुण महिला क्रिकेटपटू देखील ठरली आहे.

या कसोटीत मंधानाने ८३ आणि ७० धावा केल्या. महिलांच्या कसोटीत दोन्ही डावांमध्ये अर्धशतके झळकावणारी ती चौथी भारतीय फलंदाज ठरली. आता कसोटी क्रिकेटमध्ये तिच्या नावावर सात वेळा ५० पेक्षा जास्त धावा आहेत, जो भारतासाठी संयुक्तपणे दुसरा सर्वोच्च विक्रम आहे. सर्व फॉरमॅटमध्ये मिळून मंधानाच्या नावावर आता १०,७३७ आंतरराष्ट्रीय धावा आहेत. तिच्यापेक्षा जास्त धावा फक्त सुझी बेट्स (१०,७४०) आणि मिताली राज (१०,८६८) यांनी केल्या आहेत.

सोफी एक्लेस्टोन आणि एमी जोन्स यांनी इंग्लंडसाठी विक्रम प्रस्थापित केले. इंग्लंडला पराभव पत्करावा लागला असला तरी, सोफी एक्लेस्टोनने फलंदाजी आणि गोलंदाजी या दोन्हीमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली. तिने दुसऱ्या डावात पाच बळी घेतले आणि आपल्या कसोटी कारकिर्दीतील चौथी पाच बळींची कामगिरी पूर्ण केली. यामुळे तिच्या आंतरराष्ट्रीय बळींची संख्या ३४३ झाली, जी महिला क्रिकेटमधील तिसरी सर्वोच्च संख्या आहे.

चौथ्या डावात आठव्या किंवा त्यापेक्षा खालच्या क्रमांकावर फलंदाजी करताना अर्धशतक झळकावणारी एक्लेस्टोन ही महिलांच्या कसोटी इतिहासातील दुसरी खेळाडू ठरली.

- ९०९६३७२०८२

सिंहवाणी वृत्त हे मराठी, हिंदी भाषेतील दैनिक वृत्तपत्र प्रकाशक, मुख्य संपादक अजय दिलीपराव बिवडे यांनी हाऊस नं. ५८४२, प्लॉट नं ५२, जुने ज्ञानेश्वर नगर, मानेवाडा रोड, नागपूर (महाराष्ट्र)-४४००२७ येथून प्रकाशित केले असून मुद्रक मुद्रक अव्दैत प्रकाश चव्हाण, अव्दैत प्रिंटर्स, ग्रीन सिटी-३, वर्धा रोड, गौसी मानापूर, नागपूर-४४११०८ (महाराष्ट्र) येथून मुद्रित केले आहे. संपर्क क्र. ८६९८७८८६६६ - मेल आयडी : sinhvanivrutta@gmail.com (Reg. No : MHBIL/25/A4140)

# रक्षा बंधन दिनी महिलांसह त्यांच्या १० वर्षापर्यंत मुलां-मुलींना मोफत प्रवास

## मनपाच्या परिवहन समितीच्या बैठकीत बहुमताने प्रस्तावाला मंजुरी



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
नागपूर महानगरपालिकेच्या परिवहन सेवेत ए आय तंत्रज्ञान लागू करणे, मिनी डिझेल बसेसचे सीएनजी बसेसमध्ये रूपांतर करणे, एनएमआरडीए अंतर्गत विस्तारित मार्गांवर नवीन बससेवा सुरू करणे, शहरात ठिकठिकाणी नवीन बस निवारे उभारणे आणि परिवहन विभागाचे जाहिरात धोरण लागू करणे, अशा विविध महत्त्वाच्या प्रस्तावांना परिवहन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. याशिवाय, रक्षाबंधन निमित्त महिलांना व त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या १० वर्षांपर्यंतच्या मुलांना शहर बसमध्ये एक दिवसासाठी मोफत प्रवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. तसेच, भंगार बसेसचा वापर करून महिलांसाठी स्वच्छ व वातानुकूलित शौचालये, स्तनपान कक्ष आणि रोजगार निर्मितीसाठी स्टॉल्स उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावालाही या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

मनपाच्या परिवहन समितीची बैठक सभापती मंगला खेकरे यांच्या अध्यक्षतेखाली आज (ता. १४) डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समितीच्या सभागृहात पार पडली. या बैठकीला समितीचे सदस्य सुधीर (बंडु) राऊत, विजय होले, प्रमिला मथरानी, मंगला मस्के, रुपाली ठाकूर, पूजा पाठक, शैलेश पांडे, दिनेश यादव, शकील पटेल यांच्यासह प्र. अतिरिक्त आयुक्त तथा परिवहन व्यवस्थापक मिलिंद मेश्राम, प्रशासकीय अधिकारी योगेश लुंगे, ऑपरेशन व्यवस्थापक राजीव घाटोळे, गजानन नागूलवार, अरुण पीपरुदे, पारशर, चौलवार यांच्यासह मनपाचे इतर अधिकारी-कर्मचारी उपस्थित होते.

मनपाच्या परिवहन विभागातर्फे बस सेवा सुधारण्यासाठी 'एआय आधारित ऑटोमॅटिक पॅसेंजर काउंटिंग सिस्टीम' लागू करण्याचा प्रस्ताव समितीने मंजूर केला. या प्रणालीमुळे प्रवाशांची संख्या अचूक मोजणे, उत्पन्न गळती रोखणे आणि मार्गांचे नियोजन सुधारणे शक्य होणार आहे. तसेच, मिनी डिझेल बसेसचे सीएनजी बसेसमध्ये रूपांतर करण्याच्या प्रस्तावालाही समितीने मंजुरी दिली.

यावेळी समिती सदस्यांनी मनपाच्या सर्व बसेसच्या तपासणीसाठी सर्वपक्षीय समिती गठित करण्याची मागणी केली. यामध्ये ज्या बसेसची स्थिती चांगली असेल त्या चालू ठेवाव्यात आणि ज्या बसेसची स्थिती अत्यंत वाईट असेल त्या भंगारात टाकाव्यात, अशा सूचना समिती सदस्य शैलेश पांडे यांनी केल्या.

बैठकीत एनएमआरडीएच्या अंतर्गत विस्तारत असलेल्या ७ मार्गांवर ११ नवीन बसेसद्वारे सेवा सुरू करणे, तसेच शहरात विविध ठिकाणी 'बस निवारे' उभारणे या प्रस्तावालाही समितीने मंजुरी दिली.यावेळी समिती सदस्य सुधीर राऊत यांनी, 'बस निवारेच्या जागेची योग्य शहानिशा करून आणि स्थानिक नागरिकांचे हमीपत्र घेऊनच बस निवारा उभारण्यात यावे, अशी सूचना परिवहन विभागाला केली. परिवहन विभागातर्फे शहर बस, बस निवारे, बस आगार (डेपो), बस टर्मिनल यांसह परिवहनाशी संबंधित विविध पायाभूत मालमत्तांचे संचालन व व्यवस्थापन केले जाते. त्यामुळे उत्पन्न वाढवण्यासाठी 'जाहिरात धोरण' लागू करण्याच्या प्रस्तावास समितीने मान्यता दिली. यावेळी समिती सदस्य सुधीर (बंडू) राऊत यांनी जाहिरातींसाठी 'पीएम ई-बस' ऐवजी जुन्या बसेसना अधिक प्राधान्य देण्यात यावे, अशी सूचना केली. तर, नवीन पीएम ई-बसेसमध्ये डिजिटल जाहिराती प्रसिद्ध कराव्यात, अशी सूचना समिती सदस्य श्री. विजय होले यांनी केली. तसेच, रक्षाबंधनानिमित्त २८ ऑगस्ट रोजी महिलांना आणि त्यांच्यासोबत प्रवास करणाऱ्या १० वर्षांपर्यंतच्या मुलांना शहर बसमध्ये मोफत प्रवासाची सुविधा देण्याचा निर्णयही समितीने मंजूर केला.

'स्त्री महाशक्ती' उपक्रमांतर्गत मनपाच्या परिवहन विभागाच्या दोन भंगार बसेसचा वापर महिलांसाठी स्वच्छ व वातानुकूलित शौचालये, स्तनपान कक्ष आणि रोजगार निर्मितीसाठी करण्यात येणार आहे. ही जागा 'ग्राहक दक्षता कल्याण फाउंडेशन'ला उपलब्ध करून देण्याच्या प्रस्तावाला समितीने मान्यता दिली. तसेच, स्थायी समितीने या लोकोपयोगी उपक्रमासाठी एकूण ८ बसेसची मागणी केली होती. त्यापैकी ५ बसेस स्वयंसेवी संस्थांना प्रायोगिक तत्त्वावर मोफत (निःशुल्क) स्वरूपात रेस्टॉरंट, रिटेल शॉप, सार्वजनिक मिनी लायब्ररी आणि कॅफे उभारण्यासाठी उपलब्ध करून देण्यास मंजुरी देण्यात आली.याशिवाय, वाठोडा येथील ई-बस चार्जिंग स्टेशनसाठी ३३ केव्ही (ङश) एचटी अंडरग्राउंड केबल टाकण्याच्या ७३ लाख ६७ हजार ४७ या अतिरिक्त खर्चालाही समितीने मंजुरी दिली.तसेच, बस स्टॉप साईनेजचे सुधारित डिझाइन करणे आणि 'मेसर्स अमर एंटरप्रायझेस' यांना करारातील अटींनुसार काम करण्यास समितीने मंजुरी दिली. मनपातर्फे शहरातील एकूण १,६५० बस स्टॉपपैकी पहिल्या टप्प्यात ५०० आणि उर्वरित १,१५० बस स्टॉप टप्प्याटप्प्याने उभारले जाणार आहेत. या नवीन बस स्टॉपवर प्रवाशांची सुरक्षितता, एलईडी (छएऊ) रूट माहिती आणि क्यूआर (दफ) कोड यांसारख्या आधुनिक सुविधांचा समावेश असेल. संपूर्ण शहरातील सर्व बस स्टॉपवर एकसमान डिझाइन लागू केले जाणार आहे.

यावेळी समिती सदस्य शकील पटेल यांनी, "आमदार आणि खासदारांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसमध्ये ज्या प्रकारे प्रवासाची सुविधा दिली जाते, तशीच सुविधा मनपाच्या 'आपली बस' सेवांमध्येही देण्यात यावी, अशी मागणी केली.

**प्रवासीसंख्या २.८ लाखांपर्यंत पोहोचल्याने सभापतींकडून परिवहन विभागाचे अभिनंदन**

मनपाच्या आपली बस' सेवेअंतर्गत सोमवारी प्रवासीसंख्येने २.८ लाखांचा टप्पा गाठल्याबद्दल परिवहन समिती सभापती श्रीमती मंगला खेकरे आणि समिती सदस्यांनी परिवहन विभागाचे अभिनंदन केले. पुढच्या वेळी आपण ३ लाखांची प्रवासीसंख्या गाठू, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. यासोबतच, समिती सदस्यांनी विभागाला दिलेल्या पत्रांवर तात्काळ कारवाई करण्याचे निर्देश देत, केलेल्या कारवाईचे उत्तर थेट सभापतींकडे पाठवावे, अशा सूचना त्यांनी परिवहन विभागाला दिल्या.

# कारगावात पुन्हा निघाली तलवार!

## वाहन पार्किंगच्या किरकोळ वादातून जीवघेणा हल्ल्याचा प्रयत्न, पोलिसांनी आरोपीला घेतले ताब्यात

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
नेहमीच चर्चेत राहणाऱ्या कारगावमध्ये पुन्हा एकदा तलवारबाजीचा थरार घडल्याने गावातील कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. घरासमोर वाहन उभे करण्याच्या क्षुल्लक कारणावरून सुरू झालेला वाद काही क्षणांत इतका विकोपाला गेला की, एका व्यक्तीने थेट घरातून तलवार आणत समोरच्यावर जीवघेणा हल्ला करण्याचा प्रयत्न केला. मात्र ग्रामस्थांनी प्रसंगावधान राखत आरोपीला पकडल्याने मोठा अनर्थ टळला.

मंगळवारी रात्री साडेनऊच्या सुमारास दोन शेजाऱ्यांमध्ये वाहन पार्किंगवरून बाचाबाची झाली. वाद वाढताच महिलांनाही कथितरित्या शिवीगाळ करण्यात आली. त्यानंतर संतापलेल्या व्यक्तीने घरातून तलवार आणून समोरच्या व्यक्तीवर धाव घेतल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. घटनास्थळी उपस्थित ग्रामस्थांनी जीवाची पर्वा न करता मध्यस्थी करत तलवारधारकाला पकडले. त्यामुळे रक्तपात टळला.

मागील वर्षभरातील कारगावमध्ये तलवारबाजीची ही दुसरी घटना ठरली आहे. वारंवार घडणाऱ्या अशा घटनांमुळे गावातील कायदा-सुव्यवस्थेवर गंभीर प्रश्न उपस्थित होत असून, गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक उरला आहे का, असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. घटनेची माहिती मिळताच भिवापूर पोलीस तातडीने घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आरोपीला ताब्यात घेतले.

# शाही संदल की सुरक्षा में डटे रहे सीपी विश्वास नांगरे पाटिल

## पहली बार किसी पुलिस आयुक्त ने पैदल चलकर खुद संभाला सुरक्षा मोर्चा, उर्स में १ हजार पुलिसकर्मियों साहित चार विशेष सुरक्षा इकाइयां तैनात

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपुर**
सूफी संत हजरत बाबा ताजुद्दीन रहमतुल्लाह अलैह के १०४ वें सालाना उर्स के अवसर पर रविवार को निकले ऐतिहासिक शाही संदल में नागपुर शहर पुलिस की अभूतपूर्व सुरक्षा व्यवस्था देखने को मिली. इस दौरान शहर के नवनियुक्त पुलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटिल स्वयं शाही संदल में शामिल हुए और कई किलोमीटर तक पैदल चलकर सुरक्षा व्यवस्था की कमान संभाले रखी.

प्राप्त जानकारी के अनुसार नागपुर शहर के इतिहास में यह पहला अवसर माना जा रहा है जब किसी पुलिस आयुक्त ने स्वयं शाही संदल के साथ पैदल चलते हुए पूरे मार्ग की सुरक्षा व्यवस्था की निगरानी की। हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट के तत्वावधान में ताजबाग में आयोजित १०४ वें सालाना उर्स में देशभर से बड़ी संख्या में अकीदतमंद पहुंच रहे हैं. लाखों श्रद्धालुओं की मौजूदगी को देखते हुए नागपुर शहर पुलिस ने सुरक्षा के व्यापक इंतजाम किए हैं. इस वर्ष करीब एक हजार पुलिसकर्मियों को सुरक्षा व्यवस्था में तैनात किया गया, जिसके कारण पूरे संदल मार्ग और ताजबाग परिसर में सुरक्षा के कड़े प्रबंध स्पष्ट रूप से दिखाई दे रहे है. पुलिस आयुक्त विश्वास नांगरे पाटिल के नेतृत्व में शहर पुलिस ने चार अलग-अलग विशेष सुरक्षा इकाइयों को भी सक्रिय रखा, जिन्होंने पूरे मार्ग पर लगातार निगरानी की. साथ ही उर्स में सक्रियता से तैनात है. स्वयं पुलिस आयुक्त का पैदल चलकर सुरक्षा व्यवस्था का जायजा लेना और मौके पर मौजूद रहकर अधिकारियों को आवश्यक निर्देश देना श्रद्धालुओं के बीच भी चर्चा का विषय बना रहा.

धार्मिक आयोजनों के प्रति संवेदनशीलता और सुरक्षा को सर्वोच्च प्राथमिकता देने का संदेश देते हुए पुलिस आयुक्त ने यह स्पष्ट किया है कि नागपुर शहर की कानून-व्यवस्था और नागरिकों की सुरक्षा उनके लिए सर्वोपरि है. शाही संदल जैसे विशाल धार्मिक आयोजन में उनकी सक्रिय उपस्थिति ने यह भी संकेत दिया कि धार्मिक, सामाजिक और सार्वजनिक आयोजनों की सुरक्षा व्यवस्था में किसी प्रकार की लापरवाही बर्दाश्त नहीं की जाएगी. १०४ वें सालाना उर्स के दौरान की गई व्यापक सुरक्षा व्यवस्था के कारण शाही संदल शांतिपूर्ण, सुव्यवस्थित और श्रद्धामय वातावरण में संपन्न हुआ. जायरीनों और ट्रस्ट पदाधिकारियों ने भी पुलिस प्रशासन द्वारा किए गए सुरक्षा प्रबंधों की सराहना की.

सालाना उर्स में सुरक्षा व्यवस्था के लिए शहर पुलिस पूरी सक्रियता से तैनात है. विशेष रूप से पुलिस आयुक्त श्री विश्वास नांगरे पाटिल ने खुद इतने बड़े आयोजन पर प्रत्यक्ष मौजूद रहकर मोर्चा संभाला, यह उनके कुशल नेतृत्व को दर्शाता है, ये प्यारे जिया खान, चेयरमैन हजरत बाबा ताजुद्दीन ट्रस्ट इन्होने कहा.

# आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप; तीन पोलिस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याची प्रहारची मागणी

## कारवाई न झाल्यास 'प्रहार स्टाईल' आंदोलनाचा इशारा; बच्चू कडू घेणार पीडित कुटुंबाची भेट



**दै. सिंहवाणी वृत्त, नरखेड**
नरखेड तालुक्यातील खापा (घुडन) येथील युवक भगवान किसन मानमोडे यांच्या आत्महत्येप्रकरणी आता प्रकरणाला नवे वळण मिळाले असून, आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप करत प्रहार जनशक्ती पक्षाने तीन पोलिस कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्याची मागणी केली आहे. पोलिस उपनिरीक्षक आकाश महाकाळ, पोलिस वाहन चालक रवी मोहोड व पुरुषोत्तम काकडे यांच्याविरुद्ध कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागपूर ग्रामीण पोलिस अधीक्षकांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मागणीची दखल न घेतल्यास 'प्रहार स्टाईल' आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

भगवान मानमोडे यांच्या मृत्यूला दोन दिवस उलटूनही अद्याप संबंधित प्रकरणात कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याने गावकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे. संबंधित पोलिस कर्मचाऱ्यांची चौकशीदेखील सुरू झालेली नसल्याचा आरोप करण्यात येत आहे. पोलिसांनी कारवाईचे आश्वासन दिल्यानंतरच गावकऱ्यांनी मृतदेहावर अंत्यसंस्कार केले होते. मात्र, अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने पोलिस प्रशासनाच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. सोमवारी प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते दिनेश निंबाळकर यांनी पीडित कुटुंबाची भेट घेत त्यांचे सांत्वन केले. या प्रकरणातील दोषींवर कारवाई होईपर्यंत प्रहार संघटना शांत बसणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. नागपूर ग्रामीण पोलिस अधीक्षकांना दिलेल्या निवेदनात संबंधित तिन्ही पोलिस कर्मचाऱ्यांवर आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून तातडीने अटक करण्याची मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान, ज्यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत ते पोलिस कर्मचारी अद्याप नियमितपणे सेवेत कार्यरत असल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे निष्पक्ष चौकशी होणार का, असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

**बच्चू कडू घेणार कुटुंबाची भेट**

प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते तथा माजी राज्यमंत्री बच्चू कडू यांनी भगवान मानमोडे यांच्या आई-वडिलांशी दूरध्वनीवरून संवाद साधून त्यांचे सांत्वन केले. दोषींवर कठोर कारवाई होईल, असे आश्वासन देत लवकरच खापा येथे येऊन पीडित कुटुंबाची प्रत्यक्ष भेट घेणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**पोलिस उपविभागीय अधिकाऱ्यांशी संपर्क होऊ शकला नाही**

प्रकरणातील कारवाईबाबत माहिती घेण्यासाठी काटोलचे पोलिस उपविभागीय अधिकारी यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, दोन वेळा फोन करूनही त्यांचा मोबाईल बंद असल्याने त्यांची प्रतिक्रिया मिळू शकली नाही.

**रक्षकच झाले भक्षक?**

ज्यांच्यावर नागरिकांच्या संरक्षणाची जबाबदारी आहे, त्यांच्याविरोधातच एका युवकाला आत्महत्येस प्रवृत्त केल्याचा आरोप होत असल्याने परिसरात तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी गावकरी व विविध सामाजिक संघटनांकडून केली जात आहे.

थोडक्यात

# आशा गटप्रवर्तकांचा १७ जुलैला मोर्चा

## निवडणूक कामाची सक्ती बंद करा, जिल्हाधिकाऱ्यांवर एफआयआर दाखल करा : आयटकची मागणी

**दै. सिंहवाणी वृत्त, भिवापूर**
आयटक संलग्न महाराष्ट्र राज्य आरोग्य खाते आशा गटप्रवर्तक संघटनेच्या वतीने आशा गटप्रवर्तकांवर रक्ष आणि इछड निवडणूक कामाची सक्ती करू नये या मागणीसाठी १७ जुलै २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. संघटनेचे म्हणणे आहे की, राष्ट्रीय आरोग्य अभियान आणि विभागीय आयुक्तांनी आशा गटप्रवर्तकांना निवडणूक काम देऊ नये असे आदेश दिले आहेत.

राज्याचे सहसंचालक राजेंद्र भालेराव यांनीही याबाबत जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांना जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणण्याच्या सूचना केल्या आहेत. मात्र तरीही नागपूरचे जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि नगरपरिषदेचे उएड आशा आणि अंगणवाडी सेविकांना धमकावून काम करण्यास भाग पाडत आहेत. नकार दिल्यास त्यांच्याविरोधात पोलिसात ऋक्ष दाखल केली जात आहे, असा आरोप संघटनेने केला. त्यामुळे आता जिल्हाधिकाऱ्यांवरच शासकीय आदेशाची अवहेलना केल्याप्रकरणी एफआयआर दाखल करावी अशी मागणी संघटने केली आहे. १७ जुलै रोजी संविधान चौकातून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत मोर्चा काढून निवेदन दिले जाणार आहे.

## मनपा शाळांचा दर्जा उंचावण्याची जनशक्ती मंचाची मागणी, आयुक्तांना निवेदन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
१३ जुलै २०२६ रोजी जनशक्ती मंचाच्या वतीने सोमवारी नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त विपिन इटनकर यांना मनपा शाळांच्या गुणवत्तावाढी संदर्भात सविस्तर निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले की, गेल्या दशकभरात मनपाच्या अनेक शाळा बंद पडत असून शिक्षकांची कमतरता, शिक्षणाच्या दर्जात अपेक्षित सुधारणा न होणे, शाळांच्या इमारतींची दुरवस्था, देखभाल व दुरुस्तीचा अभाव, आधुनिक डिजिटल साधनांचा अपुरा वापर, तसेच उच्च दर्जाच्या इंग्रजी माध्यमाच्या शिक्षणाची सुविधा नसल्यामुळे विद्यार्थ्यांचा ओढा खासगी शाळांकडे वाढत आहे. यामुळे सीबीएसई पद्धतीच्या खासगी शाळांनी शिक्षणाचे व्यापारीकरण केले असून पालकांकडून मनमानी शुल्क आकारले जात आहे.

काही शाळांकडून शुल्क भरण्यासाठी कर्जाची सुविधाही उपलब्ध करून दिली जात असल्याने पालकांवर आर्थिक ताण वाढत असल्याचे जनशक्ती मंचाने निवेदनात म्हटले आहे. मनपा शाळांचा दर्जा उंचावून गुणवत्तापूर्ण व आधुनिक शिक्षण उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी करण्यात आली. यावेळी मनपा आयुक्त विपिन इटनकर यांनी मनपा शाळांचा दर्जा सुधारण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील असून, लवकरच चिचभवनसह इतर ठिकाणी काही सुधारित उपक्रम राबविण्यात येतील, असे आश्वासन दिले. निवेदन देताना जनशक्ती मंचाचे मनू दत्ता, श्याम वाद्य, रमेश मेहता, मुन्ना महाजन, नितीन नायडू, सुरेश रेवतकर, अरुण केदार, भगवानदास राठी, सिद्धू कोमजवार, माधव भोंडे, अरविंद पुरोहित, सतीश यादव, शुभम दास, जंगबहादूर यादव, डॉ. गोहर पटेल, सुनील चोखारे, दीपक पोहणेकर, संजय मेश्राम, मनोज कुहिकर आणि निनाद दीक्षित उपस्थित होते.

## खा. डॉ. नामदेव किरसान यांच्या वाढदिवसानिमित्त ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना फळवाटप



**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा - राजु फुंडे**
मा. खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्या वाढदिवसानिमित्त तालुका काँग्रेस कमिटी, सालेकसा यांच्या वतीने ग्रामीण रुग्णालय, सालेकसा येथे उपचार घेत असलेल्या रुग्णांना फळांचे वाटप करण्यात आले. वाढदिवस सेवा कार्यातून साजरा करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी राजू गजानन दोनोडे, अध्यक्ष, तालुका काँग्रेस कमिटी, सालेकसा, विजय सुदामभाऊ फुंडे, नगराध्यक्ष, नगर पंचायत, सालेकसा, शैलेश बहेकार, कार्यकारी अध्यक्ष, तालुका काँग्रेस कमिटी, सालेकसा, छन्नु भास्कर शिवणकर, सभापती, स्वच्छता व पाणी पुरवठा समिती, नगर पंचायत, सालेकसा, जोगेश्वर नागपुरे, अध्यक्ष, सेवादल काँग्रेस, सालेकसा, तसेच भास्कर शिवणकर, आशुतोष असाटी, रमेश चुटे व इतर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी रुग्णांच्या प्रकृतीची विचारपूस करून त्यांच्या उत्तम आरोग्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या. उपस्थितांनी "वाढदिवस सेवा कार्यातून साजरा करणे हीच समाजाप्रती खरी बांधिलकी आहे," असे मत व्यक्त केले. या उपक्रमाबद्दल रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांनी आयोजकांचे आभार मानले.

## मिलिंद माधव ठेंगडी यांचे निधन

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**


ज्येष्ठ पत्रकार आणि ज्योतिषशास्त्री मिलिंद माधव ठेंगडी यांचे आज मंगळवारी सकाळी अरिहंत इस्पितळात निधन झाले. शुक्रवारी त्यांच्या मुत्रपिंडाची शस्त्रक्रिया झाली होती. तरुण भारत, लोकसत्ता, नागपूर पत्रिका, न्यूज भारती यात पत्रकारिता केलेले ठेंगडी ज्योतिषाचे मासिक चालवत आणि वर्तमानपत्रांमध्ये राशिभविष्यही लिहीत असत. त्यांचे वय ६६ वर्षे होते. त्यांच्या मागे पत्नी कांचन, २ मुली, भाऊ आदी आप्तपरिवार आहे. सायंकाळी सहकारनगर घाटावर अंत्यसंस्कार पार पडला.

थोडक्यात

## कर्तव्यावर असलेल्या वीज कर्मचाऱ्याला जीवे मारण्याची धमकी; शांतीनगर पोलीस ठाण्यात अदखलपात्र गुन्हा दाखल




**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शांतीनगर येथील ११ केव्ही स्विचिंग केंद्रावर कर्तव्यावर असलेल्या वीज कर्मचाऱ्याला फोनवरून शिवीगाळ करून जीवे मारण्याची धमकी देण्यात आल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. याप्रकरणी शांतीनगर पोलिसांनी अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे. १३ जुलै २०२६ रोजी रात्री ११:४५ ते १४ जुलै २०२६ रोजी पहाटे १२:०५ या दरम्यान तांत्रिक कारणामुळे 'बिनाकी' वाहिनीवरील वीजपुरवठा खंडित झाला होता. यामुळे वैष्णवी देवी नगर, गुलशन नगर आणि वाजरा या परिसरातील वीजपुरवठा काही काळ बंद होता. यावेळी तक्रारदार दिनेश नामदेव सूर्यवंशी (वय ५१, रा. बहादुरा फाटा, उमरेड रोड) हे ११ केव्ही शांतीनगर स्विचिंग केंद्रावर आपली ड्युटी बजावत होते. दरम्यान, रुपेश छप्परघरे (वय ३०, रा. गुलशन नगर) याने तक्रारदार सूर्यवंशी यांना फोन लावून वीजपुरवठा खंडित झाल्याचा राग व्यक्त केला. संतापलेल्या रुपेशने तक्रारदाराला अश्लील भाषेत शिवीगाळ केली आणि जीवे मारण्याची धमकी दिली.

या घटनेनंतर तक्रारदार दिनेश सूर्यवंशी यांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार नोंदवली. या तक्रारीवरून पोलीस उपनिरीक्षक अमित कुंभार यांनी भारतीय न्याय संहिता (इठर) कलम ३५२ अन्वये गुन्हा (NC क्र. २१६/२६) दाखल केला आहे. पोलिसांनी तक्रारदाराला या प्रकरणात पुढील कायदेशीर कारवाईसाठी मा. न्यायालयात दाद मागण्याचा सल्ला दिला आहे. सरकारी कामात व्यत्यय आणून कर्मचाऱ्याला धमकी दिल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.

## दर्जेदार वीजसेवेसाठी आज काही काळ महावितरणला सहकार्य करा!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

नागपूरच्या वीज वितरण व्यवस्थेला अधिक सक्षम, सुरक्षित आणि आधुनिक बनवण्यासाठी महावितरण सज्ज झाले आहे. यासाठी बुधवार, १५ जुलै २०२६ रोजी महाल, कॉंग्रेसनगर आणि सिव्हील लाईन्स विभागातील काही वीज वाहिन्यांवर नवीन केबल टाकणे, उड्डाणपुलाच्या कामासाठी रोहित्र हलवणे, उपकेंद्रामध्ये नवीन व्हीसीबी बसवणे, वृक्षछाटणी आणि अत्यावश्यक देखभाल आणि दुरुस्तीची कामे केली जाणार आहेत. या कामांमुळे महाल विभागात तुळशीबाग, मॉडेल मिल, आनंदम परिसर, डी-मार्ट समोरील परिसर, सरईपेठ, सिरसपेठ, अशोक चौक, गुलाबाबा आश्रम, मांगपुरा, काशीबाई मंदिर, भोसले विहार, रहातेकर वाडी, दसरा रोड, गुजरवाडा, नाईक रोड आणि आनंदम सोसायटी. या भागातील वीज पुरवठा सकाळी सकाळी ८ ते १२ या वेळेत तर (सोबतच एसयुएसबीडीई, ईव्ही चार्जिंग स्टेशन्स, मानेवाडा रिंगरोड, उदय नगर, अंबिका नगर, आदिवासी कॉलनी, जंबुदीप नगर आणि चंद्रभागा डेअरी परिसर या भागातील वीज पुरवठा सकाळी ७ ते ११ या वेळेत बंद राहील.

कॉंग्रेसनगर विभागातील पांडे लेआउट, पायनियर सोसायटी, स्वावलंबी नगर, गावंडे लेआउट, संचयणी, टेलिकॉम नगर, स्वरूप नगर, रवींद्र नगर, फ्रेंड्स कॉलनी, खामला जुनी बस्ती, सिंधी कॉलनी, मिलिंद नगर, प्रताप नगर, रेल्वे कॉलनी, व्यंकटेश नगर, कोतवाल नगर, शांती निकेतन, शिव नगर, हिरणवार लेआउट, आनंद नगर, घरकुल परिसर, शिवणगाव पुनर्वसन ३५ व ३६. क्राऊन सोसायटी,वशाली नगर, ओम शांती नगर, मेहर कॉलनी, कचोरेपाटील, चिचभवन सर्व्हिस रोड, हुंदाई शोरूम,भुजंग नगर या भागात सकाळी ७ ते ११ या वेळेत तर सरस्वती विहार, लोखंडे नगर, पठाण लेआउट, संभाजी नगर, भांगेलॉन, भागश्री लेआउट,कॉसमॉस टाऊन, द्रोणाचार्य नगर, गोरले लेआउट, शिवश्याम नगर, सेंट पॉल स्कूल, आम्रपाली नगर, पवार नगर, अप्सरा लॉन, सौभाग्य नगर, ओम नगर, साई नगर या भागातील वीज पुरवठा सकाळी ८ ते ११ या वेळेत बंद राहील. याचसोबत सिव्हील लाईन्स विभागातः उत्कर्ष नगर, फ्रेंड्स कॉलनी, वास्तुशिल्प, म्हाडा कॉलनी, नर्मदा कॉलनी, सचिन सोसायटी, बोरनाळा, मनीष सोसायटी, मॅपल रिजन्सी, फलके लेआउट आणि वेलकम सोसायटी या बागातील वीज पुरवठा देखील सकाळी ७ ते ११ या वेळेत बंद राहील. वीज पुरवठा सुरळीत करण्यासाठी हाती घेतलेल्या या कामांमुळे होणाऱ्या गैरसोयीबद्दल महावितरणने दिलगीरी व्यक्त केली असून वीज सेवा अधिक दर्जेदार करण्यासाठी ग्राहकांनी आपल्या दैनंदिन कामांचे नियोजन या वेळेनुसार करुन सहकार्य करण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## अवैध पानठेले, अतिक्रमणावर मनपासह पोलीस करणार संयुक्त कारवाई

### पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील अन् मनपा आयुक्त डॉ. विपीन यांनी घेतली संयुक्त बैठक

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**

शाळ, महाविद्यालय यांच्या १०० मीटर परिघात असणाऱ्या अवैद्य पानठेले आणि अतिक्रमणावर नागपूर महानगरपालिका आणि नागपूर शहर पोलीस संयुक्तरित्या कडक कारवाई करावी असे निर्देश पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांनी दिले. शहरातील गुन्हेगारी प्रवृत्तीसह अतिक्रमण निर्मुलन आदी विषयांवर मनपा आयुक्त डॉ. विपीन आणि पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांनी पोलीस व मनपाच्या अधिकाऱ्यांची संयुक्त बैठक घेतली. याप्रसंगी सह पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मिलिंद मेश्राम, उपायुक्त मंगेश खवले, यांच्यासह सर्व सहायक आयुक्त, पोलीस विभागाचे सर्व उपायुक्त प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी पोलीस आयुक्त विश्वास नागरे पाटील यांनी सांगितले की, नागपूर हे देशाचे मध्यवर्ती स्थान आहे. विविध शहरातून विद्यार्थी शहरात शिक्षणासाठी येतात अशात शहरात अनेक असे अवैध पानठेले आहेत, ज्याठिकाणी अवैधपणे ड्रग्स, सिगारेट, मद्यविक्री केली जाते, अशा सर्व अवैध ठिकाणी पोलीस आणि मनपाने संयुक्त कारवाई करावी, तसेच ज्या ठिकाणी अवैधरीत्या ड्रग्स, सिगारेट, मद्यविक्री होत आहे अशा ठिकाणीची गय केल्या जाऊ नये, अशा सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

# दुबार पेरणी संकट आल्यास डीपीडीसीमधून देणार मोफत बियाणे : बावनकुळे

### पालघरच्या दापचारीत आंतरराष्ट्रीय दर्जाची कृषी बाजारपेठ उभारणार, शेत रस्त्यांसाठी स्वतंत्र 'डॅशबोर्ड' प्लॅटफॉर्मची निर्मिती

**दै. सिंहवाणी वृत्त, मुंबई**

बोगस बियाण्यांमुळे पीक न उगवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान होऊन दुबार पेरणीची वेळ आल्यास, शेतकऱ्यांना स्वखर्चाने बियाणे खरेदी करावे लागणार नाही. अशा बाधित शेतकऱ्यांना जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून मोफत बी-बियाणे उपलब्ध करून दिले जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा निर्णय घेतल्याची माहिती मंत्रिमंडळ बैठकीनंतर महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली.

मंत्रालयात माध्यमांशी बोलताना त्यांनी कृषी, शेत रस्ते, आदिवासी विकास आणि कायदा व सुव्यवस्थेबाबत सरकारच्या विविध निर्णयांची माहिती दिली.

**शेतकऱ्यांसाठी दुबार पेरणी संकट निवारण**

"राज्यात अनेक ठिकाणी (विशेषतः अमरावती, अकोला, नागपूर व इतर भागात) सप्लायरने बोगस बियाणे दिल्यामुळे सोयाबीन किंवा कापसाचे पीक उगवले नसल्याच्या तक्रारी आल्या आहेत. पीक पेरणीनंतर ते न उगवल्यास किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे उद्ध्वस्त झाल्यास शेतकऱ्यांवर दुबार पेरणीचे संकट कोसळते. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना पुन्हा आर्थिक भुर्दंड पडू नये, म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारने हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पालकमंत्री आपल्या जिल्ह्यातील 'डीपीडीसी' निधीतून शेतकऱ्यांना बियाण्यांसाठी निधी व बियाणे उपलब्ध करून देतील," असे बावनकुळे यांनी स्पष्ट केले. या निर्णयाबद्दल त्यांनी मुख्यमंत्र्यांचे आभार मानले.

**शेत रस्त्यांसाठी डिजिटल 'डॅशबोर्ड'**

शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी योग्य रस्ते उपलब्ध व्हावेत, यासाठी सरकारने एक विशेष डिजिटल प्लॅटफॉर्म आणि डॅशबोर्ड तयार केला आहे. या माध्यमातून शेत रस्त्यांची मोजणी करणे, रस्ते खुले करणे आणि त्यांना क्रमांक देणे या प्रक्रिया गतिमान केल्या जातील.



या प्लॅटफॉर्मद्वारे प्रत्येक शेतकऱ्याच्या रस्त्याबाबतच्या तक्रारीचे थेट मॉनिटरिंग (लक्ष) केले जाईल, आणि त्याचे क्रियान्वयन लवकरच संपूर्ण महाराष्ट्रात सुरू होईल.

**पालघरमध्ये आंतरराष्ट्रीय कृषी बाजारपेठ**

पालघर जिल्ह्यातील दापचारी येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची कृषी उत्पन्न बाजारपेठ निर्माण करण्याचा मोठा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. या बाजारपेठेमुळे राज्यातील शेतीमालाला जागतिक स्तरावर मोठी बाजारपेठ आणि वाव मिळण्यास मदत होणार आहे.

**आदिवासी बांधवांना वनपट्टे वाटप**

आदिवासी भागातील ज्या बांधवांना अद्याप वनहक्क पट्टे मिळालेले नाहीत, त्यांच्यासाठी वनहक्क समितीची पुन्हा बैठक घेऊन पुनर्विलोकन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. पुनर्विलोकन करून पात्र आदिवासी बांधवांना वनपट्ट्यांचे तातडीने वाटप करण्याच्या सूचना मुख्यमंत्र्यांनी दिल्या आहेत.

**वारीतील दुर्घटनाग्रस्तांना मदत आणि कायदा-सुव्यवस्था**

पंढरपूर वारीदरम्यान झालेल्या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्यांच्या कुटुंबांना आणि गंभीर जखमी झालेल्या भाविकांना शासन पूर्ण मदत करणार असल्याचा निर्णय मुख्यमंत्र्यांनी घेतला आहे. तर इगतपुरी येथे पर्यटकांना झालेल्या मारहाणीच्या गंभीर प्रकरणाची दखल घेण्यात आली असून, दोषींवर तातडीने कडक कारवाई करण्याचे आदेश पोलिसांना देण्यात आले आहेत. उल्हासनगर येथील टेंडर वादातून झालेल्या घटनेची माहिती घेऊन योग्य ती कारवाई केली जाईल, असेही महसूलमंत्र्यांनी शेवटी सांगितले.

## कोथरुडमध्ये ८ ते १० जणांकडून तरुणावर जीवघेणा हल्ला

**वृत्तसंस्था, पुणे**

पुण्यातील कोथरूड परिसरात पुन्हा एकदा कोयता गँगचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आठ ते दहा जणांच्या टोळक्याने एका तरुणावर भररस्त्यात कोयत्याने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली. या हल्ल्यात अमित शिंदे हा तरुण गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत. संपूर्ण घटना परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अमित शिंदे हा कोथरूडमधील त्याच्या मोबाईल दुकानात काम करत होता. मंगळवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास तो दुकानाबाहेर उभा असताना अचानक आठ ते दहा जणांचे टोळके तेथे आले. त्यांनी अमितवर कोयत्याने सपासप वार करण्यास सुरुवात केली.

या हल्ल्यात अमितच्या डोक्यावर कोयत्याचे दोन गंभीर वार बसल्याने तो रक्ताच्या थारोळ्यात कोसळला. या संपूर्ण घटनेचे दृश्य परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाले असून, त्याच्या आधारे पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला आहे. घटनेची माहिती मिळताच कोथरूड पोलीस घटनास्थळी दाखल झाले.

## पेंच व्याघ्रप्रकल्पातील चोर बाहुलीचा रुबाबदार वाघ टी- ९८ चा मृत्यू

**दै. सिंहवाणी वृत्त, शितलवाडी**

पेंच व्याघ्र प्रकल्पातील चोरबाहूली वनपरिक्षेत्रातील रुबाबदार वाघ टी -९८ रामटेक वनपरिक्षेत्रातील उपवनक्षेत्र खुमारी शिवारात मृत पावल्याने खळबळ वन विभागात खळबळ उडाली आहे.



सविस्तर वृत्त असे की पेंचव्याघ्र प्रकल्पा तील चोर बाहुली वनपरिक्षेत्राला लागून असलेले रामटेक वनविभाग प्रादेशिक शिवारातील मौजा खुमारी शिवारातील प्रीतपालसिंग सतपालसिंग डडियाल यांच्या शेत सर्वे नंबर ३० मध्ये पेंच व्याघ्र प्रकल्पातील चोरबाहुली परिक्षेत्रातील रुबाबदार म्हणून ओळखल्या जाणाऱ्या टी-९८ वाघ हा सोमवारी चोरबाहुली परिक्षेत्रातील कर्मचारी गस्त करत असताना त्यांना हा वाघ कमजोर अवस्थेत आढळला याबाबतची तात्काळ माहिती चोरबाहुली वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे व रामटेक वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे यांना कळविण्यात आली त्यांनी तातडीने वन विभागाच्या टीम सह घटनास्थळी दाखल होऊन कमजोर अवस्थेत असलेल्या वाघावर कर्मचाऱ्यांच्या देखरेखी खाली पाडत ठेवण्यात आली. मंगळवारी सकाळपासून दोन्ही परिक्षेत्रातील कर्मचारी टीमने वाघाच्या हालचालीवर नियंत्रण ठेवून होते परंतु दुपारी अंदाजे १२:३० च्या दरम्यान सदर वाघ कुठली हालचाल करीत नसल्याचे कर्मचाऱ्यांच्या निदर्शनात आल्याने व वाघाजवळ जाऊन बघितले असता मृत झाल्याचे दिसून आले.

घटनेची माहीती वरिष्ठ अधिकारी पेंच व्याघ्र प्रकल्पातील सहाय्यक उप वनसंरक्षक पूजा लिंबा गावकर सहाय्यक वन संरक्षक गोविंद लूचे वनपरिक्षेत्र अधिकारी जयेश तायडे वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल शिंदे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. बावस्कर यांच्या उपस्थितीत पंचनामा करून पुढील कारवाईसाठी टीटीसी नागपूर येथे हलविण्यात आले पुढील कारवाई उपवनसंरक्षक डॉ. विनिता व्यास नागपूर यांच्या उपस्थितीत एनटीसीए च्या मार्गदर्शना प्रमाणे उत्तरीय तपासणी करुन अंत्यसंस्कार करण्यात आले.

## खंड विकास अधिकाऱ्यांनी घ्यावी 'भीष्म पितामह' नव्हे, तर कर्तव्यदक्ष प्रशासकाची भूमिका!

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**
**राजु फुंडे**

अति दुर्गम व नक्षलप्रभावित म्हणून ओळख असलेल्या सालेकसा तालुक्यात शासनाच्या विविध लोककल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी होणे अपेक्षित असताना, काही विभागांमध्ये लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी नागरिकांमध्ये चर्चेचा विषय ठरत आहेत. या पार्श्वभूमीवर पंचायत समिती प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरही प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.




पंचायत समिती कार्यालयाच्या अखत्यारीत सामान्य प्रशासन, पंचायत, शिक्षण, कृषी, पशुसंवर्धन, बांधकाम व ग्रामीण पाणीपुरवठा, महिला व बालकल्याण, वित्त, मनरेगा आणि घरकुल असे अनेक महत्त्वाचे विभाग कार्यरत आहेत. या विभागांमार्फत शासनाच्या विविध योजना नागरिकांपर्यंत पोहोचवल्या जातात. मात्र काही नागरिकांच्या म्हणण्यानुसार, विशेषतः घरकुल व मनरेगा योजनांमध्ये अनियमितता होत असल्याच्या तक्रारी पुढे येत आहेत.

तक्रारीनुसार, घरकुल योजनेचा हप्ता (बिल) काढण्यासाठी काही लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी केली जाते. पैसे न दिल्यास "शासनाकडून निधी आलेला नाही, त्यामुळे तुमचा हप्ता मंजूर होऊ शकत नाही," असे सांगितले जात असल्याचा आरोप लाभार्थी करत आहेत. त्यामुळे अनेक गरीब कुटुंबांना उसनवारी करून पैसे देण्याची वेळ येते आणि त्यानंतरच त्यांच्या खात्यावर हप्ता जमा होत असल्याचे बोलले जात आहे.

याचप्रमाणे, मनरेगा अंतर्गत घरकुलाशी संबंधित मजुरीचे बिल काढताना काही ठिकाणी रोजगार सेवकांच्या माध्यमातूनही पैशांची मागणी होत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. या प्रकारामुळे शासनाच्या पारदर्शक कारभारावर प्रश्न उपस्थित होत असून, गरीब लाभार्थ्यांना मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत असल्याची भावना व्यक्त होत आहे.

सालेकसा हा अति दुर्गम आणि नक्षलप्रभावित तालुका असूनही अशा प्रकारच्या तक्रारी पुढे येत असतील, तर याबाबत संबंधित प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. खंड विकास अधिकाऱ्यांना या घडामोडींची माहिती नाही का? की माहिती असूनही त्या दुर्लक्षित केल्या जात आहेत? असा प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

शासनाच्या योजनांचा लाभ कोणत्याही आर्थिक व्यवहाराशिवाय, पारदर्शक आणि प्रामाणिक पद्धतीने प्रत्येक पात्र लाभार्थ्यापर्यंत पोहोचला पाहिजे. यासाठी संबंधित विभागांची सखोल चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे.

# सालेकसा आणि आमगाव शाखेची सहविचार सभा आणि नवनियुक्त केंद्रप्रमुख सत्कार समारोह संपन्न

**दै. सिंहवाणी वृत्त, सालेकसा**
**राजु फुंडे**

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती शाखा सालेकसा आणि शाखा आमगाव यांची संयुक्त सभा तसेच पंचायत समिती सालेकसा आणि पंचायत समिती आमगाव येथे विभागीय परीक्षा उत्तीर्ण होऊन रुजू झालेले नवनियुक्त केंद्रप्रमुख यांच्या सत्कार कार्यक्रम संपन्न झाले.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती गोंदिया चे जिल्हाध्यक्ष संदीप तिडके होते. प्रमुख अतिथी म्हणून किशोर डोंगरवार, संदीप मेश्राम, ई. एफ.देशमुख , शिक्षक पतसंस्था आमगावचे शाखाध्यक्ष शोभेलाल ठाकूर, संचालक राजेंद्र बोपचे, संचालक सतीश दमाहे, शिक्षक समिती आमगाव चे अध्यक्ष के.जी. रहांगडाले, सालेकसा पी.एम.ढेकवार, जिल्हा पदाधिकारी दादाजी पंधरे, यू.जी.फरदे,सुरेंद्र मेंढे तालुका सचिव,दिलीप होटे मार्गदर्शक, श्री.येटरे मार्गदर्शक, श्सेवकराम रहांगडाले तालुका सचिव आणि बहुसंख्येने इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमत सत्कारमूर्ती म्हणून केंद्रप्रमुख अमित घावले, मुकेश रहांगडाले, सानप सर, अमोल काडुसे, सुनील हरिणखेडे, महेंद्र रहांगडाले, नितीन टेंभूर्णे, श्सतीश भोंडवे केंद्र प्रमुख होते. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांचा पुष्पगुच्छ द्वारे स्वागता द्वारे झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक के.जी.रहांगडाले सर यांनी केले.

सहविचार सभेत खालील मुद्द्यांवर विशेष प्रकाश टाकून ठराव मंजूर करण्यात आले. सालेकसा आणि आमगाव तालुका कार्यकारणीतील रिक्त पदावर लवकरच निवड करण्यात येईल, इतर संघटनेचे पदाधिकारी समितीत प्रवेश इच्छुक असणाऱ्याना लवकरच प्रवेश देण्यात येईल. सालेकसा आणि आमगाव तालुका कार्यकारणीच्या आढावा घेण्यात आले. सभासद नोंदणी अभियान राबविण्यात येईल असे ठरले. न्यायालयीन मार्गाद्वारे एस-१४ लागू करण्यासाठी प्रयत्न करावा असा निर्णय घेण्यात आला,संपूर्ण जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती द्वारे झिरो पेंडेन्सी अभियान राबविण्यात येईल असे निश्चित झाले.

सर्व सदस्यांच्या हितार्थ चांगले निर्णय घ्यावा अशी मागणी श्री किशोर भाऊ डोंगरवार सर,अध्यक्ष, गोंदिया जिला प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्था यांच्या समक्ष करण्यात आली. सर्व शिक्षकांचे हित जोपासले जाओ अशी आग्रही भूमिका नवनियुक्त केंद्रप्रमुखांकडे यांच्या समोर मांडण्यात आली. भविष्यकालीन येणाऱ्या समस्याना तोंड देण्यासाठी सर्व मिळून महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीला साथ देण्यात यावी असे आवाहन करण्यात आले.

सहविचार सभेनंतर सालेकसा आणि आमगाव पंचायत समिती अंतर्गत विभागीय परीक्षेद्वारे रुजू झालेल्या नवनियुक्त केंद्रप्रमुख यांचा तालुका निहाय तालुका शाखे द्वारे सोबतच मान्यवरांच्या हस्ते डायरी आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले.

अनिल मेश्राम पंचायत समिती आमगाव यांच्या वाढदिवस साजरा करण्यात आले. सर्व मान्यवरांच्या आभार व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

याप्रसंगी समितीचे इतर पदाधिकारी क्रमशः एन.जी. कांबळे,व्हि.एन. सांगळे, पी.आर.ठाकरे,एस.पी.बैठवार,ए. एन.सरवदे,आर. एस. बसोने, डी.बी. दहिलकर, एम.एन. निंबार्क, एस.एन. गायधने, एस.डी.मडावी, एन.जी.घासले, एम. सी. मेळे,संतोष जाधव, के.एम.कटरे,जयेश लिल्हारे, विनोद रंगारी,संतराम जाधव, गणेश लोहाडे, संजय रहांगडाले, राठोड,भालाधारी, श्री.चौधरी, बुधेवार,सोनटक्के, डी. के. बनोठे, अशोक पारधी आणि इतर शिक्षक वृंद उपस्थित होते.

# दिव्यांगाना व्यवसाय प्रतिष्ठानासाठी उपलब्ध जागांची ओळख निश्चित करावी !

## महापौर निता ठाकरे यांचे निर्देश

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
दिव्यांग नागरिकांच्या हक्कांचे संरक्षणासह त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून द्याव्यात तसेच दिव्यांग बांधवाना विविध शासकीय योजनांचा प्रभावी लाभ मिळवून देण्यासाठी गठीत समितीची महापौर निता ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली मनपाच्या डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती स्थायी समिती सभागृहात मंगळवारी (ता.१४) बैठक पार पडली. यावेळी दिव्यांगाना व्यवसाय प्रतिष्ठानासाठी १०० ते २०० चौ. फूट जागा उपलब्ध करून देण्यासाठी मनपा, नागपूर सुधार प्रन्यास आणि नझुलशी समन्वयसाधून जागेचा शोध घ्यावा असे निर्देश महापौर निता ठाकरे यांनी दिले.

बैठकीत स्थायी समिती सभापती शिवानी दाणी-वखरे, दुर्बल घटक समिती सभापती कु.लक्ष्मी हत्तीठेले, नगरसेवक दिनेश यादव, मनपाचे अतिरिक्त आयुक्त मुरुगानंथम एम., मिलिंद मेश्राम, उपायुक्त डॉ. रंजना लाडे, उपायुक्त मंगेश खवले, मुख्य लेखा तथा वित्त अधिकारी सदाशिव शेळके, सहायक आयुक्त सुनील कावळे, क्रीडा अधिकारी डॉ. पियुष आंबुलकर, शिक्षणाधिकारी वंदना महाजन, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर, कार्यकारी अभियंता अल्पना पाटणे,



अश्विनी येलचेटवार यांच्यासह इतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी महापौरांनी दिव्यांगांच्या कल्याणासाठी विविध विषयांवर सविस्तर चर्चा करून संबंधित विभागांना आवश्यक निर्देश दिले. तसेच सर्व पात्र दिव्यांगांना व्यवसायासाठी २०० चौरस फूट जागा उपलब्ध करून देण्याकरिता शहरातील उपलब्ध जागांचे सर्वेक्षण करून मनपा, एनआयटी, नझूल तसेच इतर शासकीय संस्थांच्या उपलब्ध जागांची ओळख निश्चित करावी, बसस्थानक, उद्याने व इतर योग्य ठिकाणी दिव्यांगांना व्यवसायासाठी अधिकृत जागा उपलब्ध करून देण्याबाबतचा अहवाल सादर करण्यास संबंधित विभागांना सूचित केले. याशिवाय दिव्यांगांच्या मालमत्ता करात ५० टक्के सवलत देण्याबाबत सर्वंकष अभ्यास करून आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश महापौरांनी दिले.

दिव्यांगांना देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्यात वाढ करण्याबाबतही बैठकीत चर्चा झाली. २०१६ मध्ये दोन लाख रुपये असलेले अर्थसाहाय्य नंतर ९५ हजार रुपयांवर आल्यामुळे वाढत्या महागाईच्या पार्श्वभूमीवर ही रक्कमेत वाढ करण्यात यावी तसेच ती टप्प्याटप्प्याने वितरित करण्याबाबत संबंधित विभागाने प्रस्ताव तयार करावा, असे निर्देश महापौरांनी दिले.

याशिवाय बैठकीत दिव्यांगांच्या विविध प्रश्नांवर सातत्याने पाठपुरावा करण्यासाठी तीन सदस्यीय समिती गठित करण्याचा निर्णय घेण्यात आला.

तसेच मतिमंद घटकातील दिव्यांगांसाठी निर्वाह भत्ता योजनेत वाढ करण्याबाबत आणि राजमाता जिजाऊ अर्थसहाय्य योजनेचा लाभ ६० टक्के दिव्यांगता असलेल्या पात्र लाभार्थ्यांनाही देण्याबाबत सकारात्मक चर्चा करण्यात आली. 'दिव्यांग निरामय आरोग्य विमा' योजनेअंतर्गत लाभार्थ्यांच्या सोयीसाठी झोननिहाय अथवा मध्यवर्ती ठिकाणी आरोग्य तपासणी केंद्र सुरू करण्याबाबत संबंधित विभागाने नियोजन करावे, असे निर्देशही देण्यात आले.

# धार्मिक अर्थव्यवस्था भारताच्या सर्वसमावेशक विकासाचा भक्कम आधार!

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
स्वाधीनता ग्राम विकास अँड पीस फाउंडेशनतर्फे नागपुरात "धार्मिक अर्थव्यवस्था अभ्यास सत्र" आयोजित करण्यात आले होते. या सत्रात राष्ट्रिय अर्थतज्ज्ञ सीए शेताली ठाकरे यांनी धार्मिक अर्थव्यवस्थेचा भारताच्या आर्थिक व सामाजिक विकासातील महत्त्वपूर्ण वाटा अधोरेखित केला. कार्यक्रमाला कॅट चे राष्ट्रीय अध्यक्ष सीए बी. सी. भारतीय, वास्तुविशारद अभिषेक देशपांडे तसेच मंत्री आशीष जयस्वाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आशीष जयस्वाल यांनी ग्रामीण व धार्मिक अर्थव्यवस्था ही भारताच्या सर्वसमावेशक विकासाची भक्कम पायाभरणी



असल्याचे सांगितले. या क्षेत्रांचा अभ्यास, संवर्धन आणि धोरणात्मक विकास करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले. सीए श्वेताली ठाकरे यांनी सांगितले की, प्राथमिक अंदाजानुसार भारताची धार्मिक अर्थव्यवस्था सुमारे २० लाख कोटी रुपयांची असून ती देशाच्या जीडीपीच्या जवळपास ४ टक्के आहे. या क्षेत्रामुळे सुमारे २.५ कोटी नागरिकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध होत असून लघु व्यापारी, फेरीवाले, कारागीर, वाहतूक, पर्यटन, आदरातिथ्य सेवा आणि ग्रामीण उद्योजक यांना त्याचा मोठा लाभ होत आहे. त्यामुळे धार्मिक अर्थव्यवस्थेचे शास्त्रीय मोजमाप व अभ्यास करण्याची वेळ आल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सीए बी.सी.भारतीय यांनी महाकुंभ हे भारतीय परिपत्र अर्थव्यवस्थेचे उत्कृष्ट उदाहरण असल्याचे सांगितले. अशा धार्मिक आयोजनांमुळे लाखो लघु व्यापाऱ्यांना मोठा आर्थिक फायदा होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

वास्तुविशारद अभिषेक देशपांडे यांनी पिंटू कोळी यांच्या उदाहरणाचा उल्लेख करत महाकुंभ काळात त्यांच्या व्यवसायाची जवळपास ३० कोटी रुपयांची उलाढाल झाल्याचे सांगितले. उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनीही या यशाचा उल्लेख केल्याचे त्यांनी सांगितले. भारताच्या स्वदेशी आर्थिक मॉडेलचा सखोल अभ्यास करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

समारोपात सीए शेताली ठाकरे यांनी कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी प्रमाणे रिलिजियस सोशल रिस्पॉन्सिबिलिटी ही संकल्पना मांडली. धार्मिक संस्थांमध्ये सुशासन, पारदर्शकता, विश्वास आणि सामाजिक सलोखा वाढवून सर्वसमावेशक विकासाला चालना देण्यासाठी अशा चौकटीची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

या अभ्यास सत्रात समीर कुलकर्णी, आदित्य व्यास, अनुप हुद्दार, नरेश अरसाडे, उमेश धोटे, किशोर धाराशिवकर, सीए आर. के. गनेरीवाला, सीए सुमन अग्रवाल, सपना तलरेजा, पूजा झाम आणि राखी ठाकूर यांच्यासह अनेक अभ्यासक, उद्योजक व सामाजिक कार्यकर्त्यांनी सहभाग नोंदविला.

## पुण्यात निलेश घायवळ गँग पुन्हा सक्रिय?

**वृत्तसंस्था, पुणे**
पुण्यात निलेश घायवळची टोळी पुन्हा एकदा सक्रिय झालीय का हा प्रश्न उपस्थित होत आहे. कारण मंगळवारी कोथरुडमध्ये ज्या अमित शिंदे याच्यावर कोयत्याने वार करण्यात आला, तो निलेश घायवळच्याविरोधात दाखल करण्यात आलेल्या एका गुन्ह्यातील फिर्यादी आहे. बनावट कागदपत्रांच्या आधारे निलेश घायवळने अमित शिंदे यांच्या कोथरुडमधील मोबाईल दुकानातून सीमकार्ड घेतले होते. पोलिस तपासात ही बाब लक्षात आल्यानंतर अमित शिंदेच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्याच अमित शिंदेवर काल कोयत्याने हल्ला करण्यात आला. हा हल्ला वैयक्तिक कारणातून झाल्याचं पोलीसांच म्हणणं आहे.

## समाजकार्य भूषण डॉ. चंदनसिंह रोटेले स्मृती सुवर्णपदक शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी प्रेरणादायी ठरेल

**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
समाजकार्य क्षेत्रातील तज्ज्ञ, ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ तथा रोटेले ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे संस्थापक अध्यक्ष स्व. डॉ. चंदनसिंह रोटेले यांना आदरांजली म्हणून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात "समाजकार्य भूषण डॉ. चंदनसिंह रोटेले स्मृती सुवर्णपदक" सुरू करण्यासाठी रोटेले ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे अध्यक्ष डॉ. केदारसिंह रोटेले यांनी ३ लाख रुपयांचा धनादेश विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांच्याकडे सुपूर्द केला.

स्व. डॉ. चंदनसिंह रोटेले यांच्या ६९ व्या जयंतीनिमित्त ( ६ जुलै ) आयोजित कार्यक्रमात हा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी रोटेले ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सच्या संस्थापक अध्यक्षा डॉ. काजोल रोटेले, संचालिका किरणताई रोटेले, माजी सिनेट सदस्य मधू रोटेले तसेच संचालक प्रा. अमोलसिंह रोटेले उपस्थित होते. याप्रसंगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाचे प्रभारी कुलसचिव व ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. विजय खंडाळ, समाजकार्य अभ्यास मंडळाचे



अध्यक्ष डॉ. नरेश कोलते तसेच ऑरेंज सिटी कॉलेज ऑफ सोशल वर्कचे प्राचार्य डॉ. महेंद्रकुमार मेश्राम उपस्थित होते.

यावेळी डॉ. केदारसिंह रोटेले यांनी कुलगुरू डॉ. मनाली क्षीरसागर यांना स्व. डॉ.चंदनसिंह रोटेले यांनी समाजकार्य व शिक्षण क्षेत्रात दिलेल्या अमूल्य योगदानाची माहिती दिली. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण घेऊन त्यांनी समाजातील शेवटच्या घटकाच्या उन्नतीसाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या कायार्चा गौरव आणि विद्यार्थ्यांना समाजकार्य क्षेत्रात प्रेरणा मिळावी, या उद्देशाने "समाजकार्य भूषण डॉ. चंदनसिंह रोटेले स्मृती सुवर्णपदक" सुरू करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. हे सुवर्णपदक शैक्षणिक गुणवत्ता आणि समाजकार्य क्षेत्रातील उत्कृष्ट कायार्ला प्रोत्साहन देणारे ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. या सदिच्छा भेटी दरम्यान विद्यापीठाचे शैलेन्द्रसिंह राठोड, प्रा. कल्पना मुकुंदे, डॉ. शालिनी तोरे, डॉ. सुलोक रघुवंशी, मंगलप्रसाद रहांगडाले, श्री ठाकरे तसेच रोटेले ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूशन्सचे पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

# चिचघाट येथे दारूबंदी महिला मंडळाच्या सदस्यांना मारहाण; पोलीस पाटलालाही धक्काबुक्की, तिघांविरुद्ध गुन्हा

### अवैध दारू विक्रीला विरोध केल्याचा राग; अश्लील शिवीगाळ, जीवे मारण्याची धमकी

**दै. सिंहवाणी वृत्त, वरोरा**
**धर्मेंद्र शेरकुरे**
वरोरा तालुक्यातील शेगाव बु पोलीस ठाण्याच्या हद्दीतील चिचघाट येथे गावातील दारूबंदी महिला मंडळाच्या सदस्यांनी अवैध दारू विक्री रोखण्याचा प्रयत्न केला असता तिघांनी महिला सदस्यांशी धक्काबुक्की, अश्लील शिवीगाळ तसेच जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना सोमवारी (दि. १३ जुलै) सकाळी घडली. या प्रकरणी शेगाव (बु.) पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी अंकुश बाबा शिवरकर (पोलीस पाटील, रा.



चिचघाट) यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, गावातील महिला मंडळाने दयाराम हिवरकर यांच्या शेताजवळ अवैध दारू पकडल्याची माहिती मिळाल्यानंतर ते घटनास्थळी गेले. तेथे महिला मंडळाच्या सदस्यांनी दारू जप्त करण्याचा प्रयत्न केला असता आरोपी पंजाब अंधरेले, अर्जुन अंधरेले व सागर अंधरेले (रा. वाहनगाव) यांनी महिलांना अश्लील शिवीगाळ करत धक्काबुक्की केली. या झटापटीत काही महिलांना किरकोळ दुखापत झाली फियार्दी पोलीस पाटील मध्यस्थी करण्यासाठी गेले असता त्यांनाही धक्काबुक्की करून शर्ट फाडण्यात आला व जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यानंतर आरोपी दारूची पिशवी घेऊन तेथून पसार झाले.

यावेळी गावातील गावातील उपसरपंच, तंटामुक्ती अध्यक्ष, पोलीस पाटील सहित महिला, पुरुष, युवक यांनी मोठ्या प्रमाणात शेगाव पोलीस स्टेशनच्या पटांगणात सकाळी नऊ वाजता पासून ते सायंकाळी सहा वाजता पर्यंत ठिय्या मांडत दारूबंदी करीता ठाम भूमिका घेतली असता वरोरा पोलीस ठाण्याचे सपोनि यांनी मध्यस्थी करून गावातील नागरिकांना विश्वासात घेऊन शांत केले..

एकीकडे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक हे अवैध धंदे करणाऱ्यांवर कठोर कारवाई करून कायद्याचा वचक निर्माण करीत असताना शेगाव पोलीस स्टेशन अंतर्गत मोठ्या प्रमाणात अवैध धंदे फोफावत आहे. दोन दिवसाआधी स्थानिक शेगाव मध्येच अवैध रेती तस्करांकडून तलवारीने वाढदिवसाच्या केक कापण्याची घटना ताजी असतानाच अशाप्रकारे अवैध धंदे करणारे जर खुलेआम नागरिकांना धमक्या देत असतील तर त्यांना कायद्याचा धाक उरला नाही का शेगाव येथील पोलीस प्रशासन मुंग गिळून गप्प आहे का? असा प्रश्न शेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील नागरिकांच्या मनात निर्माण होत आहे.

या प्रकरणी शेगाव (बु.) पोलीस ठाण्यात आरोपी पंजाब अंधरेले, अर्जुन अंधरेले व सागर अंधरेले यांच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता (इठर) २०२३ अंतर्गत कलम ११५(२), १३२, २९६, ३(५) आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक सुमित ईश्वर कांबळे करीत आहेत.

थोडक्यात


## ज्योतिबा विद्यालयात माजी विद्यार्थी व शिक्षकांचे स्नेहमीलन उत्साहात



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
ज्योतिबा माध्यमिक विद्यालय, नागपूर येथे तब्बल १८ वर्षांनंतर माजी विद्यार्थी आणि शिक्षकांचा स्नेहमेळावा मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमात २००८ साली शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थी, माजी शिक्षक आणि माजी मुख्याध्यापक गणेश लांबट तसेच मुख्याध्यापिका अरुणा कडू मोठ्या संख्येने सहभागी झाले. कार्यक्रमाची सुरुवात वृक्षारोपण करून करण्यात आली. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत उपस्थित मान्यवर आणि माजी विद्यार्थ्यांनी विद्यालय परिसरात वृक्षारोपण केले. त्यानंतर सर्वांनी आपल्या शालेय जीवनातील आठवणींना उजाळा दिला. अनेक वर्षांनंतर भेट झाल्याने विद्यार्थी आणि शिक्षकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

यावेळी शिक्षकांचा शाल, श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना जीवनात प्रामाणिकपणा, सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांनीही आपल्या यशस्वी वाटचालीचे अनुभव सांगत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी माजी विद्यार्थी राकेश भोयर आणि संपूर्ण टिमने परिश्रम घेतले.

## बिबट्याचा राष्ट्रीय महामार्ग ओलांडताना अपघाती मृत्यू



**दै. सिंहवाणी वृत्त, शितलवाडी**
मंगळवार पहाटेच्या सुमारास राष्ट्रीय महामार्ग ओलांडत असतांना एका बिबट्याचा अज्ञात वाहनाच्या धडकेत अपघाती मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच वन विभागाचे अधिकारी व कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून, मृत बिबट्याचा मृतदेह ताब्यात घेण्यात आला आहे. संबंधित पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत शवविच्छेदनाची प्रक्रिया पूर्ण करून वन्यजीव संरक्षण अधिनियम व वन विभागाच्या नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात आली. सदर प्रकरणाचा अधिक तपास सुरू असून संबंधित वाहनाचा शोध घेण्याचे प्रयत्न सुरू आहेत. राष्ट्रीय महामार्गालगत वनक्षेत्र असल्यामुळे वाहनचालकांनी वेगमयार्देचे पालन करावे, विशेषतः रात्रीच्या वेळी सावधगिरीने वाहन चालवावे, जेणेकरून वन्यप्राण्यांचे अपघाती मृत्यू टाळता येतील.

सदर कार्यवाही करत्यावेळी पेंच व्याघ्र प्रकल्प उपसंचालक अक्षय गजभिये स उपसंचालक यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली. या वेळी पेंच व्याघ्र प्रकल्प सहाय्यक वनसंरक्षक कु. पुजा लिंबगावकर सवस (अशिप्रक) पेंच व्याघ्र प्रकल्प वनपरिक्षेत्रा (एकसंघ नियंत्रण )पवनी अभिजीत माने, वनपरिक्षेत्र अधिकारी (एफडीसीएम) पवनी, जे. बी. केंन्द्रे तसेच पशुवैद्यकीय अधिकारी (वन्यजीव) नागपुर, डॉ. रोहिणी टॅभुर्णे, पशुवैद्यकीय अधिकारी देवलापार, डॉ. विरेन्द्र, पशुवैद्यकीय अधिकारी देवलापार, डॉ. एस. सी. मानडलिक ,क्षेत्र सहाय्यक पवनी (ए. नि), एस.पी. राठोड , क्षेत्र सहाय्यक चोरबाहुली (ए.नि), आय. आर. पठान, वनरक्षक द. पथरई के. पी. लांबघरे आर. के. कारेमोरे वनरक्षक द. उसरीपार, वनरक्षक डी. एस. लेंभे, आर. एस. राऊत , यु.एम. बावणे, बंडुजी उईके सातपुडा फाऊडेंशन, (बायोलॉजीस्ट), श्रीकांत ढोबळे, अधिराज सिंग व इतर वनकर्मचारी अधिकारी, उपस्थित होते.

## हिंदू मुलींची शाळामध्ये पालक सभेचे आयोजन



**दै. सिंहवाणी वृत्त, नागपूर**
श्रीमती दादीबाई देशमुख हिंदु मुलींच्या शाळेत नव्या सत्राची पहिली पालक सभा यशस्वीरित्या पार पडली. सभेला पालकांचा भरघोस प्रतिसाद लाभला. नव्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने आयोजित या पालक सभेत विविध समित्यांचा आढावा घेण्यात आला. त्याचबरोबर शाळेत विद्यार्थ्यांसाठी घेण्यात येणाऱ्या शैक्षणिक घडामोडीची उकल देखील करण्यात आली. शाळेची माजी विद्यार्थिनी वंशिका देशमुख हिने जापनीज लैंग्वेज बद्दल माहिती दिली. स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. रवींद्र फडणवीस यांनी देखील विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी शाळेने आणि पालकांनी काय करावयास हवे याबद्दल सूचना दिल्या. पालकांना आणि शिक्षकांना मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका माया बमनोटे यांनी वार्षिक अहवालातून शाळेची यशस्वी वाटचाल पालकांसमोर सांगितली.

शाळेचे उपमुख्याध्यापक सुबोध आष्टीकर यांच्यासह पालक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आणि आभार प्रदर्शन पल्लवी देशमुख यांनी केले.